# ख्रिस्तायन

## नाताळ २००२

| | | | |
|---|---|---|---|
| वर्ष: १ | अंक: १ | डिसेंबर २००२ | खाजगी वितरण |



मारीया प्रिंटींग प्रेस, नालासोपारा (प). फोन: 2414813

# ख्रिस्तायन

नाताळ २००२

वर्ष: पहिले अंक: १ ला

खाजगी वितरण मूल्य रू. १०/-

## अंतरंग

* संपादकीय
* महिनाभर मुक्काम
* तो तर येऊन गेला
* ख्रिसमस
* भोळयाच्या म्हशी
* नातं
* माहिती तंत्रज्ञान युग
* मूतखडा
* संगीत — एक अखंड साधना
* अनुभव
* काव्यपुष्प
* कूतूहल
* पर्यावरण जगत
* बॉलीवूडचा इतिहास
* क्रिडा जगत
* बोधपर गोष्टी

**प्रकाशक**
फा. डॉ. एलायस रॉड्रिग्ज

**संपादक**
ख्रिस्तोफर रिबेलो

**सहसंपादक**
एमील आल्मेडा

**जाहिरात विभाग**
सॉलोमन रिबेलो (प्रमुख)
मॅथ्यू रिबेलो
डॅनियल फरगोज
ह्यूबर्ट फरगोज
लेस्टर रिबेलो
ॲल्वीन रिबेलो

**वितरण विभाग**
विलास रिबेलो (प्रमुख)
मिल्टन परेरा
नितीन रिबेलो
एडविन परेरा
स्वप्नील रिबेलो
बॉनेट आल्मेडा

**संपर्क**
ख्रिस्तोफर रिबेलो
चौकाळे, निर्मळ
फोन: 2401492

**मुद्रक**
मारीया प्रिंटर्स, नालासोपारा

**कॉम्प्युटर टाईपसेट**
हाय-टेक कॉम्प्युटर्स
फोन: 2405501

ख्रिस्तायन या नाताळ अंकाचे प्रकाशन, प्रकाशक **फा. डॉ. एलायस रॉड्रिग्ज** यांच्या संमतीने व संपादक मंडळाच्या साहाय्याने **फा. विल्सन रिबेलो** यांच्या हस्ते पवित्र त्रैकय चर्च, गोम्स आळी परिसर येथे ५ डिसें. ०२ रोजी झाले.

**✳ ऋणनिर्देश ✳**

'ख्रिस्तायन' साठी साहाय्य करणाऱ्या सर्व जाहिरातदार, लेखकगण, देणगीदार व हितचिंतक यांना नाताळ व नव वर्षाच्या अनेक शुभेच्छा.

अंकात छापलेल्या मजकूराशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही

# संपादकीय

**स्वप्न देवाचे आज हो साकारले**
**बाळ देवाचे धरती उतरले,**

*प्रारंभी शब्द होता आणि शब्द देवासह होता आणि शब्द देव होता. शब्द देह झाला आणि आपल्या पापांचे क्षालन व्हावे म्हणुन त्याने आम्हामध्ये वस्ती केली. जो खरा प्रकाश प्रत्येक मनुष्याला प्रकाशित करतो, तो जगात आला, तो प्रभू येशू ख्रिस्त, याचा जन्मदिवस म्हणजे आपला नाताळचा सण.*

*आपल्या वसई तालुक्यातील ख्रिस्ती समाजाच्या नाताळ सणाला एक खास 'टिपीकल वसई टच' आहे. डिसेंबरच्या पहिल्या रविवारी आगमन काळ सुरू झाला की आपल्याला ख्रिसमसचे वेध लागतात. मग वेगवेगळ्या प्रकारची शॉपिंग..... आठवडाभर अगोदरपासुन गोठा तयार करण्यासाठी गावाच्या वेशी पाशी जमा होणारे तरूणांचे जथ्थे..... त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी हजर असलेली अनुभवी प्रौढ मंडळी..... घराघरातून येणारा तो चकल्या, करंज्या, फुगे (वडे) यांचा वास..... सारं वातावरण कसं अगदी 'ख्रिसमस'मय होऊन जातं..... दिवस मावळेपर्यंत सर्व तयारी होतेय तोच 'मिडनाइट मास' ची तयारीसाठी धावपळ चाललेली असते. त्यातच येणारा कॅरल सिंगर्सचा ग्रूप आणि लाडक्या सांताबाबाचे होणारे आगमन..... प्रत्येक जणाची या ना त्या कामासाठी धांदल उडालेली असते. नाताळच्या दिवशी होणारी पंचपक्वानांची मेजवानी..... दुपारनंतर दिवस मावळेपर्यंत चालणारे वेगवेगळया प्रकारचे स्पोर्टस्..... त्यासाठी एकत्र आलेला संपूर्ण गावपरीवार..... प्रत्येकाच्या घरी जणू एखाद मोठा समारंभ असल्यासारखे वातावरण असते.*

*हे सगळे चित्र डोळ्यासमोरून जात असताना एक कल्पना सूचली, अरे..... आपले हिंदू बांधव दिवाळी किती जोशात साजरी करतात. फटाके तसेच गोडधोड फराळाच्या जोडीला दिवाळी अंकांच्या रूपाने मिळणारा साहित्यिक फराळ दिवाळीचा आनंद द्विगुणित करत असतो. मग आज वसईत मराठी भाषिक ख्रिस्ती बहुसंख्येने असताना त्यांच्या नाताळच्या मौजमजेत साहित्यिक मेजवानीची भर पडावी म्हणून का प्रयत्न करू नये ?*

*यातूनच 'ख्रिस्तायनचा' उगम झाला. अनेक वेगवेगळया विषयांवर मान्यवरांकडुन कथा - लेख मागवले गेले. सर्व मान्यवर लेखकांनी उत्तम कलाकृती पाठवून अंकाचा दर्जा उंचावण्यात सिंहाचा वाटा उचलला. खर्च भरून निघेल इतक्याच जाहिराती घ्यायच्या म्हणजेच **'No Loss No Profit'** या तत्वावर आवाहन केले गेले. फारसा प्रतिसाद मिळाला नाही तरीही अंक काढायचाच या जिद्दीने आम्ही हा उपक्रम हाताळला, त्याचेच फळ, आज हा अंक तुमच्या हाती देताना मन आनंदाच्या डोही विहार करतंय.*

*आमचा 'नाताळ अंक' काढायचा हा पहिलाच प्रयत्न आहे म्हणूनच सर्व प्रकारच्या प्रतिक्रिया व सुचनांची आम्हाला आपणांकडून अपेक्षा आहे. आम्ही त्यांचे सहर्ष स्वागत करू.*

*शेवटी, 'ख्रिस्तायन' रूपी सांताक्लॉज तुमच्या भेटीस येत आहे.*

***Jingle bells, Jingle bells, Jingle all the way***
***Santa Claus is coming along riding on a sleigh***

*नाताळ व नववर्षाच्या लाख लाख शुभेच्छा.*

*Christopher Rebello*

# महिनाभर मुक्काम जम्मू – काश्मीर

फा. डॉ. एलायस रॉड्रिग्ज, निर्मळ

ओळंबवाडी, पापडी येथील माझे मित्र फा. आयवन परेरा यांच्या आग्रहपूर्वक निमंत्रणावरुन मला महिनाभर जम्मू – श्रीनगर धर्मप्रांताचा दौरा करता आला. प्रस्तुत वास्तव्यातील अनुभव सशब्द करताना सुरुवात सर्वांच्या मनात असलेल्या तेथील आतंगवादाच्या प्रभावाविषयी करावीशी वाटते.

अलिकडेच पार पडलेल्या विधान सभेच्या यशस्वी निवडणूकांनंतर तिथलं वातावरण 'बरंच निवळलेलं जाणवत होतं. दहशतवादाचे प्रकार फारच तुरळक असे घडत होते. पीडीपी व कॉंग्रेस प्रणीत युतीच्या नवीन सरकारमुळे बहुसंख्य लोकांना शांतीची, सुव्यवस्थेची आणि विकासाची स्वप्नं पुन्हा पडू लागली आहेत. हे सगळं खरं असलं तरीसुध्दा तेथील परिस्थिती पूर्णपणे सुधारण्याकरिता नवीन सरकारला प्रयत्नांची पराकाष्टा करावी लागणार, हे उघड आहे. तिथे सर्वत्र दिसणारी बंदुकधारी सैनिकांची गस्त, दिवस मावळताच होणारा शुकशुकाट, अनेक ठिकाणी अनेक वेळा प्रवाशांची होणारी कडक तपासणी, नेहमी बरोबर ओळखपत्र ठेवण्याची आवश्यकता, वाहतुक खात्याची व पोलीस यंत्रणेची शिथीलता, मोबाईल सेवेचा अभाव इत्यादी गोष्टींवरुन तेथील वातावरणातला तणाव जाणवल्याशिवाय राहात नाही. सुदैवाने जम्मू, काश्मीर, पूंछ व लडाक या चारही विभागांत चर्च, धर्मगुरु आणि धर्मभगिनी यांच्या नि:स्पृह, समर्पित व आव्हानात्मक सेवाकार्यामुळे लोकांच्या अंत:करणात असलेली आदरभावना व कृतज्ञता वेळोवेळी व ठिकठिकाणी दिसून आल्याशिवाय राहात नाही.

जम्मू विभागात आंतरराष्ट्रीय किर्तीचे वैष्णो देवी म्हणून जे प्रार्थना स्थळ कट्रा या ठिकाणी सुमारे १३ किलोमिटर उंच चढल्यावर पहायला मिळते तेथील भाविकांची रीघ, सर्व सुखसोयींची उपलब्धता, स्वच्छता, घोडयावर बसून जाण्याची वा पालखीत बसून जाण्याची व्यवस्था इत्यादी गोष्टींनी मन अगदी भारावून जाते. येथील सर्व प्रकारची व्यवस्था अप्रतिमरित्या सांभाळली जाते, हे आवजून नमूद करावेसे वाटते. जय माता दी! या व्यतिरिक्त जम्मू मध्ये असंख्य प्रार्थनास्थळे, कितीतरी पूल, बाहू-ई-बाग, बिशप्स हाऊस आणि कथिड्रल, मानसर बगीचा, दुर्गम भागातील मिशन केंद्रे इत्यादी स्थळे पाहताना परमेश्वराने या राज्यावर वैभवाची कशी उधळण केली आहे, याचा अचंबा वाटल्याशिवाय राहत नाही.

काश्मीर आणि जम्मू हे दोन विभाग सुमारे ३०० किलोमीटर अंतरावर आहेत. प्रथम जम्मूला जाऊन जर आपण सुमोने किंवा बसने श्रीनगर काश्मीरला जायचे ठरवले तरच हे राज्य किती उंचावर आहे व तिथे वर चढताना ते किती देदीप्यमान नैसर्गिक सौंदर्याने समृध्द आहे, हे अनुभवायला मिळते. श्रीनगरहून पुन्हा जम्मूला तसेच परत येताना त्याच निसर्गरम्य वैभवाचे निराळे उत्तुंग आणि सखोल दर्शन घडते. भारतीय रेल्वे जम्मूपर्यंत पोचली आहे व लौकरच ती काश्मीरमधील बारामुल्ला नगरापर्यंत नेण्याचा सरकारचा मानस आहे.

काश्मीरमधील प्रेक्षणीय स्थळांमध्ये दाल सरोवराचा प्रथम उल्लेख करावयास हवा. अबब! किती अफाट जलाशय हया सरोवरामध्ये सामावलेला आहे! हया सरोवराच्या सभोवती जो छानपैकी ऐसपैस रस्ता बांधलेला आहे त्याच्या एका बाजूला चस्मे चस्म, निशात, शालिमार व हार्वन हे मोगल काळातील बहारदार बगीचे बघायला मिळतात तर दुसऱ्या बाजूला दाल सरोवराचे नयनरम्य, शांत-निवांत दृश्य पाहणाऱ्याला हृदय पुलकित करणाऱ्या विश्रांतीची अनुभूती देते. याचठिकाणी एका टेकडीवर शंकराचार्यांचे जे मंदिर आहे तिथे गेल्यावर श्रीनगर शहराचे विहंगम दृश्य पाहता येते. गुलमार्ग नावाचा जो हिरव्यागार टेकडयांचा समूह आहे तो परिसर खरोखर पृथ्वीवर स्वर्ग उतरल्यासारखा मनमोहक आहे. इथे गोंडोला म्हणून जी केबल-कार सेवा आहे ती तर अविस्मरणीयरित्या रोमांचकारी आहे. याशिवाय येथे सर्वोत्कृष्ट गणल्या जाणाऱ्या बर्न हॉल हायस्कूल व प्रेझेन्टेशन कॉन्व्हेंट स्कूल या आपल्या कॅथलिक संस्था खरोखर अनन्यसाधारण आहेत. तसेच येथील डिचिगॅम नॅशनल पार्क, फिश फार्म, बारामुल्ला येथील १०० वर्षांपेक्षा जुने फ्रान्सिस्कन मिशनरीज ऑफ मेरी या संस्थेचे मिशन हॉस्पिटल, तेथील सेंट जोसेफ हायस्कूल, फा. जिम बॉस्ट ह्या हॉलंडमधील

मिशनरी धर्मगुरुंनी सुमारे ४० वर्षे निष्ठावंत तपस्या करुन उभारलेल्या तीन काश्मीरी कॅथलिक संस्था, जम्मू आणि काश्मीर बँकेची सुमारे ३३ कोटी रुपये खर्च करुन बांधलेली वैशिष्ट्यपूर्ण इमारत, जांभळया केशरफुलांनी बहरलेली शेते, जणू पेटून उठलेले धगधगते भव्य चिनार वृक्ष, इतर विविध वृक्षांच्या आकाशाला भिडणाऱ्या रांगाच रांगा, अनेक भव्योदात्त मशीदी, शिकारा (House Boats) अशी कितीतरी प्रेक्षणीय स्थळे आपल्याला एका आगळया वेगळया विश्वात घेऊन जातात.

लडाक आणि पूंछ या दोन अत्यंत दुर्गम विभागांत सर्व प्रकारच्या आव्हानांना समर्थपणे तोंड देत आपले मिशनरी धर्मगुरु आणि धर्मभगिनी अविचल श्रद्धेने शुभवर्तमानाची साक्ष देत आहेत, हे समजून घेताना आपल्या श्रद्धेलाही खतपाणी मिळते; आपली श्रद्धा देखील बळकट होऊ लागते व आपल्याला तिचा रास्त अभिमान वाटू लागतो.

जम्मू-श्रीनगर हा धर्मप्रांत जम्मू राज्याशी समकक्ष (Co-extensive) आहे. म्हणजेच वर नमूद केलेले चारही विभाग मिळून होणारा हा धर्मप्रांत एकूण क्षेत्रफळाच्या दृष्टीने जम्मू-काश्मीर राज्याइतका व्यापक असला तरीही तिथे फक्त १५,००० ख्रिस्ती लोकसंख्या आहे व सुमारे ६० कॅथलिक संस्था चालवण्यासाठी एकूण तीस धर्मगुरु व १६० धर्मभगिनी कार्यरत आहेत. धर्मगुरुंची उणीव ही तेथील बिशप पीटर सेलेस्तीन यांच्यापुढील एक प्रमुख समस्या आहे. इतर भारतीय धर्मप्रांतांतील काही धर्मगुरु निदान काही वर्षे तिथे मिशन कार्य करण्यासाठी यावे, असे तेथील बिशपांना मनोमन वाटते. तसेच व्रतबद्ध, धर्मभगिनी, धर्मबंधू आणि धर्मगुरु यांच्या अधिकाऱ्यांनी जम्मू-श्रीनगर धर्मप्रांतामध्ये निदान एक जरी संस्था चालू केली तर तेथील शुभवर्तमानप्रसार (Evangelisation) कार्याला गती मिळाल्याशिवाय राहणार नाही. मात्र तेथील मायनर सेमिनरी (धर्मगुरु विद्यालय) व सुमारे २५ गुरुविद्यार्थी पाहिल्यानंतर या धर्मप्रांताचे भवितव्य उज्वल आहे, असे वाटल्यावाचून रहात नाही. आपल्या वसईतील एक धर्मगुरु व तीन गुरुविद्यार्थी या धर्मप्रांतासाठी गेलेले असून यापुढे इतर अनेक तरुणांना हे आव्हानात्मक पाचारण मिळावे, अशी कळकळीची प्रार्थना करण्याची गरज आहे.

येथील बिशप व विकर जनरल याच्या कृपेमुळे मलादेखील अल्पशी का होईना सेवा करता आली. उदा. निरनिराळया मिशन स्थळांना भेटी देऊन तेथील भाविकांसाठी ऊर्दुप्रभावित हिंदीमधून पाक (= पवित्र) मिस्सा अर्पण करण्याची व प्रवचने देण्याची संधी, तेथील सिस्टरांना व धर्मगुरुंना प्रबोधन करण्याची संधी, शाळेतील शिक्षकांना व नर्सिंग स्कूलमधील विद्यार्थीनींना दिलेली ''मनावरील ताबा व स्मरणशक्तीचा विकास'' या विषयांवरील व्याख्याने व प्रात्याक्षिके, प्रार्थना सभांचे संचालन, हायस्कूल मधील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याची संधी इत्यादी.

जम्मू-काश्मीरच्या सर्व सामान्य लोकांची काही वैशिष्ट्ये प्रामुख्याने लक्षात आली ती येणेप्रमाणे :-

- अत्यंत प्रेमळ स्वभाव, आदरातिथ्य वृत्ती, पाहुणचारात दिलदारपणा
- आपल्या मुलांना उत्तम शिक्षण देण्यासाठी वाट्टेल तो त्याग करण्याची तयारी
- हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन, शीख या धर्मांच्या भाविकांचे श्रध्दामय जीवन व परस्परांविषयीचा आदर
- मूलतत्त्ववादी वृत्तीचा (Fundament-alism) निषेध व तिरस्कार
- बहुसंख्य लोकांचा भारतीय राष्ट्राभिमान
- फुलांप्रमाणे चेहऱ्यांवरील टवटवीतपणा
- काश्मीरी भाषा, पाकशास्त्र व संस्कृतीयांचा रास्त अभिमान
- स्वतंत्र, प्रशस्त नव्या आधुनिक घरांची आवड, इत्यादी.

डोंगर माथ्यावरुन आणि कड्यांवरुन आपले वाहन श्रीनगर क्षेत्रात प्रवेश करते तेव्हा ''धरतीवरील स्वर्ग आपले स्वागत करीत आहे'', या आशयाचा फलक पहायला मिळतो. परत येताना ''किती सार्थ आहे तो फलक!'' अशी आपली खात्री पटते.

# तो तर येऊन गेला

सी. बी. दोडती

नाताळच्या सणाचे ते दिवस होते सणासुदीचा आनंद सर्वत्र पसरला होता. आपआपल्या घराला रंगरंगोटी करण्यांत उत्साही भाविक लागले होते. बाळ येशूचा जन्मोत्सवाचा देखावा उभारण्यात गावागावात आपलाच गोठा पहिल्या क्रमाकांत यावा म्हणून ही तरुण मुले जीव ओतून नवनवी कल्पना लढवून गोठा सजविण्यात गुंतली होती तर वयस्कर माणसे नवनवे दागदागिने, कपडेलत्ते, घराचे सुशोभीकरण करण्यात गुंतली होती. ज्याचीत्याची वेगवेगळी नाताळसणासाठी तयारी चालती होती. मात्र अशा हया आनंदाच्या प्रसंगी मारियावाडीतली दुमी आजी वेगळयाच विचारांत दंग होती. दुमी आजी एक भक्तीमान बाई होती. येशू ख्रिस्त आणि मारिया हयांच्यावर तिचे अतुट प्रेम होतं. हयाच प्रेमापोटी तिने आपल्या घराला आपल्या मुलाला सांगून 'मारियावाडी' हे नाव दिले होते. दररोजची मिस्सा ती कधी चुकवत नसे. रोझरीची प्रार्थना तिची नित्यनेमाने होत होती. स्त्रियांच्या सोडॅलिटीत तिचा सिहांचा वाटा होता. निरनिराळया तीर्थयात्रेला ती जात असे, वेलंकनीला ती दरवर्षी नित्यनेमाने जाई. वांद्रयाची मोत मावली देखील ती सोडत नसे. जून महिन्यातले रमेद मावलीच्या नोव्हेनाचे सर्व शनीवार ती हटकून पाळत असे. उठल्या बसल्या तिच्या तोंडात जेजूस, मावली हे नाव घोळत असे. अशी अतिशय श्रद्धाळू दुमी आजी नाताळचा सण आल्यावर स्वस्थ कशी बसेल तिने देखील आपल्या घराला रंगरंगोटी केली होती. नव्या साडया, नवे कपडे आणि नव्या अलंकारांनी तिने आपली मुळेबाळे आणि नातवंडे, सूना यांना मढविले होते. तिने स्वत:साठी देखील नवे लालभडक लुगडे तायाकडून मागवून घेतले होते. आणि विशेष म्हणजे आपल्या मुलांकरवी एक छानसा गोठयाचा देखावा तयार करुन घेतला होता.

अशा आनंदात डुबत असलेल्या दुमी आजीला ख्रिस्त बाळ आपल्या घरी यावा याचा मोठा ध्यास लागला होता. ती म्हणे "मी एवढी भक्ती करते, दानधर्म करते, तीर्थयात्रा करते मग बाळ येशू माझ्या घरी का येणार नाही? मी गावच्या बायाबापडयाहून कितीतरी वेगळी आहे. माझ्या छातीवर मोठा क्रूस आहे. माझ्या कमरेला चांदीची मौल्यवान रोझरी आहे. माझा दररोज मावलीचा तेस घरात चालत आहे. मग माझ्या घरात बाळ येशू येणारच, मी त्याच्यासाठी काय कमी केलंय?" अशा तोऱ्यात दुमी आजी सारखी राहात असे आणि त्या दिवशी नाताळ सणाच्या मध्यरात्रीच्या मिस्साला दुमी आजी हटकून झकपक पोशाख करुन गळयात दागदागिने घालून हातात चांदीची रोझरी घेऊन गेली होती. देवळात तिची जागा ठरलेली होती. वेदीच्या समोरच्या पहिल्या बाकावर दुमी आजी कायमची बसायची त्या जागेवर दुसरी कोणी बाई बसलेली दुमी आजीला आवडत नसे. जर एखादी स्त्री तिच्या बाकावर बसलेली दिसली तर दुमी आजी तिला बाजूला बसावयास भाग पाडी. तेव्हा हया नाताळ सणाच्या मिस्सावर देखील ती आपल्या ठरलेल्या जागेवर बसली होती. हया दिवशी मिस्सावर प्रवचन देताना धर्मगुरूंनी उपस्थित भाविकांना उद्देशून एक गोष्ट सांगितली की आज सणाच्या दिवशी बाळ येशू साक्षात आपल्या घरी येणार आहे आणि कोणकोण त्याच्यावर खरी प्रिती करतो याची तो परिक्षा घेणार आहे. तेव्हा सर्वांनी सावध राहून बाळ येशूच्या आपल्या घरी येणाच्या तयारीला लागा आणि त्याचे जंगी स्वागत करण्यात सज्ज रहा.

दुमी आजीने प्रवचनाच्या वेळी फादरांनी सांगितलेली गोष्ट ऐकून अतिशय आनंद व्यक्त केला. ती म्हणाली 'बाळ येशू प्रथम माझ्या घरी येणार. गावात दुसऱ्यांच्या घरी तो जाणारच नाही. तेव्हा मलाच प्रथम बाळ येशूच्या स्वागताची जंगी तयारी करावी लागेल.' त्याप्रमाणे दुमी आजी घरी येताच कामाला लागली. घर झाडून स्वच्छ केले. तेथे सुगंधी अत्तराची फवारणी केली. चांगले

गोडधोड करुन ताट भरुन ठेवला. अंगण गोठा झाडून स्वच्छ केला. बाळ येशूच्या पायावर गरम पाणी आणि सुंदर फुले घालण्यासाठी तिने चांदीच्या ताटात फुले आणून दरवाजात ठेवली आणि मुलांना, नातवंडा-सुनांना सांगितले 'बाळ येशू आपल्या घरी आल्यानंतरच आपण सर्वांनी त्याच्याबरोबर जेवण घ्यायचे'.

ठरल्याप्रमाणे दुमी आजी दारात बसून बाळ येशू येण्याची वाट पाहात बसली. दुपारची बारा वाजले, एक वाजला पण बाळ येशू काही आला नाही. दुमी आजी कंटाळली. ती मनांत म्हणाली 'बाळ येशू मला विसरला की काय, पण तो मला कसा विसरेल, मी तर त्याची एकमेव भक्तीमान स्त्री आहे. इतक्यात तिच्या दारासमोर एक भिकारीण, तिचा भुकेलेला मुलगा आणि तिचा आंधळा पती भीक मागत आले व तिच्याकडे खावयास मागू लागले. त्यावर संतापून दुमी आजी म्हणाली "जन्माचे दरिद्री मेले, तुम्हाला हयाचवेळी यायला वेळ मिळाली का?, जा आता, काय नाय माझ्या घरात! माझा बाळ येशू येत नाय, त्याची मला चिंता लागलीय. चला, चालते व्हा, मग कधी तरी या". ते भिकारी कुटुंब पुढे निघून गेले. संध्याकाळ झाली तरी बाळ येशू तिच्या घरी आणि गावात देखील आला नाही. दुसऱ्या दिवशी तणतणत दुमी आजी फादरांना म्हणाली, "तुम्ही एवढे खोटारडे कसे? बाळ येशू काही आलाच नाही" त्यावर फादर म्हणाले "दुमीबाय, तूच खोटं बोलतेस, बाळ येशू आला नाही कसा? तो तर सारखा फिरत असतो, घराघरात, गावागावात, तुझ्याच घरी तो कसा नाय आला" त्यावर दुमी आजी म्हणाली, "फादर मी कधीच खोट बोलत नाय. सबंध दिवस उपाशी राहून बाळ येशूची वाट पाहात होते. पण दुपारच्या वेळेला एक भिकारी कुटुंब माझा जीव खावयास आले. सांगत होते, 'माझा बाळ उपाशी आहे, त्याला खावयास काही दे' मग फादर म्हणाले 'असं का? मग तू काय केले?'

"मी त्यांना शेपाटून लावले. म्हणाली माझा बाळ येशू येत नाय त्याची मला चिंता लागलीय. तुम्ही कशाला जीव खायला आलात?" फादर म्हणाले "मग तू असं कसं सांगतेस, बाळ येशू तुझ्या घरी आलाच नाही? तो तर तुझ्या घरी येऊन उपाशीच गेला"

दुमी बाय म्हणाली "फादर, ते कसे काय?"

फादर म्हणाले "दुमीबाय, ते भिकारी कुटुंब येशूचे होते. येशू काय श्रीमंत आहे. तो तर भिकारीच आहे. तोच तर तुझ्या घरी भिकाऱ्याच्या रुपात आला होता. तू त्याला शेपाटून लावले."

दुमीबाय आजीचे तोंड पाहण्यासारखे झाले. तिची गर्विष्ठ प्रतिमा एकदम काळीठिक्कर पडली. ती डोक्याला हात मारत म्हणाली "फादर, मला क्षमा करा. आज माझे डोळे उघडले. माझा अहंमपणाच मला नडला.

*****

*By doing well the duty which is nearest to us*

*The Duty which is in out hands now*

*We make ourselves stronger and improving our strength in this manner step by step*

*We may even reach a state in which It shall be our privilege to do the most coveted*

*And Honoured duties in life and society.*

*- Swami Vivekanand -*

# ख्रिसमस

*ख्रिस्तोफर रिबेलो*

'ख्रिसमस' हा शब्द *Christ's Mass* या शब्दावरुन आला आहे. जगातील सर्वात मोठा धर्म असलेल्या ख्रिस्ती धर्माचा मेंढपाळ प्रभू येशू ख्रिस्त याचा जन्मदिन म्हणून हा दिवस साजरा केला जातो. येशू ख्रिस्ताचा जन्म नक्की २५ डिसेंबरलाच झाला की नाही हे कोणालाही माहित नाही. परंतु ३३६या वर्षी काही ख्रिस्ती पुढाऱ्यांनी एका मुर्तिपुजक देवाच्या सणाचा दिवस मागे टाकण्यासाठी प्रयत्न करीत असताना दक्षिणायन चालू होत असतानाचा २५ डिसेंबर हा दिवस येशू ख्रिस्ताचा जन्मदिन म्हणून साजरा करण्याचे ठरवले. आरंभी ख्रिसमस हा फक्त एका साध्या मिस्साने साजरा व्हायचा पण कालांतराने वेगवेगळया देशातील वेगवेगळया पंरपरेनुसार हा दिवस निरनिराळया तऱ्हेने साजरा होऊ लागला.

ख्रिसमसच्या दिवशी ख्रिस्ती लोक एकमेकांना भेटवस्तू प्रदान करतात. ही परंपरा मागी लोकांनी येशूला दिलेल्या भेटीची आठवण म्हणून सुरु झाली. पुर्वेकडून आलेल्या त्या तीन ज्ञानी लोकांनी सोने, उद व गंधरस या वस्तू बाळ येशूला अर्पण केल्या होत्या. गोठयाच्या देरवाव्यात 'ख्रिसमस ट्री' सजाविण्याची परंपरा सर्वप्रथम ७व्या शतकात जर्मनीमध्ये चालू झाली आणि नंतर हळूहळू सर्व जगभर पसरली. सुरुवातीला लोक 'कॅन्डीज' आणि केक फितीने या ख्रिसमस ट्रीवर बांधत असत. १६व्या शतकात मार्टीन ल्युथर यांनी या झाडावर मेणबत्त्या लावायला सुरुवात केली. १८८० मध्ये सर्वप्रथम 'ख्रिसमस ट्री' घराबाहेर समजविली जाऊ लागली. आणि त्या बरोबरच बेगडी वस्तू व कापुस या 'ख्रिसमस ट्री'वर सजविण्यात येऊ लागल्या.

ख्रिसमसच्या दिवसापासून (२५ डिसेंबर) ते प्रकटीकरणाच्या दिवसापर्यंत (६ जानेवारी) हे ख्रिसमसचे १२ दिवस साजरे केले जातात. ६ जानेवारीच्या दिवशी तीन ज्ञानी (मागी) लोक येशूस भेटावयास आले असे मानले जाते. ख्रिसमसच्या दिवसाएवढेच त्याच्या पुर्वसंध्येला महत्व आहे. तसे ख्रिस्ती नियमानुसार कोणत्याही महत्वाच्या दिवसांच्या (उदा. रविवार, सणाचा दिवस) पूर्व संध्येला त्या दिवसाएवढेच महत्व असते. आदल्या दिवसाच्या पाच वाजल्यापासूनचे कोणतेही धार्मिक कार्यक्रम मुख्य दिवसाचे म्हणून समजले जातात. परंतु ख्रिसमसच्या पुर्वसंध्येला महत्व काही निराळेच आहे. गोठा सजविणे, मध्यरांत्रीच्या मिस्साची तयारी करणे, प्रत्यक्ष मिस्सा यामुळे आदल्या दिवशीच उत्सवाचे वातावरण असते. तसेच 'ख्रिसमस कॅरोल्स्' या दिवशी गायली जातात.

पवित्र भूमी (जेरुसलेम) जिथे येशूचा जन्म झाला तिथे तीन प्रकारच्या पुर्वसंध्या साजऱ्या केल्या जातात. पहिली साजरी होणारी पूर्वसंध्या प्रोटेस्टंट-कॅथोलिक चर्चची आहे. दुसरी ग्रीक ऑर्थोडॉक्स, कॉप्टीक आणि सिरीयन चर्चची असते. आणि तिसरी पूर्वसंध्या आर्मेनिअन चर्चची असते. तिघांच्याही प्रार्थनेच्या वेळा सारख्याच असतात. पण वेगवेगळया भाषेत वेगवेगळया प्रकारे हया प्रार्थना होतात. ख्रिसमसच्या दिवशी प्रोटेस्टंट बांधव सकाळच्या न्याहारीनंतर देवळात जातात आणि तेथून एकमेकांना नाताळच्या शुभेच्छा देण्यासाठी एकमेकांच्या घरी जातात. कॅथोलिक धर्मगूरु पवित्र पाणी घेऊन प्रत्येक घरोघरी जातात. या पाण्यातून घरच्या प्रत्येक सदस्याला एक घोट पाणी प्यायला दिले जाते. ग्रीक ऑर्थोडॉक्स चर्चसाठी प्रकटीकरण (Epiphany), ६ जानेवारी हा दिवस महत्वाचा असतो. त्या दिवशी चर्चमध्ये विशेष प्रार्थना आयोजित केली जाते. त्यावेळी पाणी आर्शिवादीत करण्यासाठी त्यात एक क्रूस बुडविला जातो. ते आर्शिवादीत पाणी प्रत्येक जण घरी नेतो आणि काहीही खायच्या अगोदर तीन घोट प्राशन करुन मगच न्याहारी किंवा जेवण केले जाते.

**सांता क्लॉज :**

सांता क्लॉज म्हणजे ख्रिस्ती संत

निकोलस. तिसऱ्या शतकात ते मायरा (आताचे टर्की) या शहरी राहात असत. एका श्रीमंत कुटुंबात ते जन्माला आले. लहान वयातच ते अनाथ झाले. ते मठात वाढले आणि वयाच्या १७व्या वर्षी धर्मगुरु झाले, सर्वात तरुण धर्मगुरु होते ते. त्यांच्या औदार्याविषयी अनेक कथा सांगितल्या जातात की त्यांनी सर्व संपत्ती गरजवतांना भेटरुपाने वाटली. ते घराच्या धुराडयातून किंवा खिडकीतून पैसे किंवा सोने असलेल्या पिशव्या टाकत. ते राहात त्याच्या बाजूच्या गावात एका माणसाच्या तीन मुली लग्नाच्या झाल्या होत्या. परंतु पैशाअभावी त्यांची लग्ने होत नव्हती व गरिबी त्यांना शरीरविक्रय करण्यास भाग पाडणार आहे असे निकोलस यांना समजले. त्यांनी सोन्याची नाणी असलेली पिशवी घराच्या धुराडयातून त्या माणसाच्या घरात टाकून दिली. त्या पैशाने मोठया मुलीचे लग्न झाले. असेच त्यांनी पुढे दोघा मुलींच्या वेळीसुद्धा त्यांनी मदत केली. काही वर्षानंतर ते बिशप झाले. बिशप झाल्यानंतरचा पोशाख असा होता, बिशपांची टोपी, लाल लांब झगा व पांढरी दाढी. बिशप निकोलस यांनी गोर गरिबांना भरपूर मदत केली. ते नेहमी जेथे अन्याय होत असेल तेथे न्यायासाठी झटत असत. त्यांच्या मृत्युनंतर लोक त्यांचा धावा करु लागले. पुढे त्यांना संतपदाचा मान मिळाला.

त्याच शतकात ख्रिसमस साजरा होऊ लागला आणि संत निकोलस यांचा कर्मधर्म संयोगाने त्या सोहळयात समावेश झाला. प्रोटेस्टंट पंथ अस्तित्वात आल्यानंतर त्यांनी संत निकोलस यांना 'गिफ्ट गिव्हर' म्हणून मानण्यास नकार दर्शविला कारण संत निकोलस हे कॅथलिक चर्चशी निगडीत होते. त्यानंतर वेगवेगळया देशात वेगवेगळे 'गिफ्ट गिव्हर' झाले. फ्रांसमध्ये 'पेरे नोएल', इंग्लंडमध्ये 'फादर ख्रिसमस', जर्मनीमध्ये 'ख्रिसमसमॅन', रशियात 'ग्रँडफादर फ्रॉस्ट' व हॉलंडमध्ये 'सिंटर क्लाउस' अशा वेगवेगळया नावाने ते पुढे आले. सिंटरक्लाअसचा अपभ्रंश होऊन पूढे सांताक्लॉज हा शब्द रुढ झाला.

*****


'ख्रिस्तायन' च्या पहिल्या वहिल्या नाताळ अंकास
हार्दिक शुभेच्छा व अनेक आशिर्वाद
त्याचप्रमाणे
नाताळचा सण व नविन वर्षाच्या त्रैक्य
परीवारातील सर्व जनतेस शुभेच्छा.




सौ. रिटा व श्री. पास्कोल गोम्स
गोम्स आळी.

# भोळ्याच्या म्हशी........!

पॉल रुमाव, नंदाखाल.

आमच्या गावातील मुले शाळेत दुसरी-तिसरीपर्यंतच शिकत त्या काळातील ही एक गमतीची गोष्ट.

तशी गावची भौगोलिक रचना मोठी पदध्तशीर. गावाच्या उगवतीला बागायती वाडया. सर्व वाडयांत बारमास केळी, नारळी, पोफळी व आंबे यांची हिरवीगार झाडे. त्या झाडांमध्ये लपलेली वाडीवाल्यांची छोटी मोठी घरे. वीस पंचवीस फूट माती उकरली की, लागला गोडया पाण्याचा झरा. उन्हाळयातही कधी न आटणारा! मात्र पावसाळयात सर्व विहिरी चार महिने तुडुंब भरलेल्या. त्यावरच्या रहाटाची पिरपीर आठ महिने सदा चाललेली. थोडी मधुर, थोडी कर्कश! वाडीचे मालक सदा वाडीत गुंतलेले आणि सारी बागाईत बारा महिने रंगीबेरंगी फुलाफळांची बेलबुट्टी चितारलेला हिरवा शालू परिधान केलेली!

झाडा झुडूपांनी आच्छादलेल्या हया वाडयांच्या मावळतीला मोठे मोकळे शिवार. गावाची काळी आई! साऱ्या गावाला पोसणारी, उन्हाळयात रखरखीत, पण एकदा मृगाचा पहिला पाऊस प्याली की आषाढात हिरवा शालू नेसून तयार. जणू एक षोडशा! आणि भाद्रपदात मात्र हिरवा शालू दूर सारुन पिवळा भरजरी पितांबर नेसलेली व अलंकारांनी नटलेली, लाजाळू, नववधू! अशा हया वैभवशाली शिवारात भूमिपुत्रांची, पावसाळयातील चार महिने इरली-धोंगडी डोकीवर घेऊन सारखी चाललेली धावपळ! हया शिवाराच्या मावळतीला थोडा फार उंचवटा. मोकळे उघडेरान गावची गुरचरण. त्यापलीकडे अथांग पसरलेला व सदा खवळलेला दर्या. दिवसभर साऱ्या जगाला प्रकाश आणि उष्मा देऊन थकलेल्या - भागलेल्या दिनकराचे विश्रांतीधाम. माळरानाच्या उजव्या हातावरच्या अर्नाळा गावापासून डाव्या हातावरच्या कळंब, रानगावापर्यंत नजर पोहचणार नाही इतके मोकळे माळरान - गुरचरण.

गोठयात बैलांची जोडी, दुधासाठी व शेणासाठी एक दोन म्हशी किंवा गाई हे वाडीवाल्यांचे दैवत-भूषण! रहाटावर पाण्याचा वार नसला की बैल रिकामे. मग गाई म्हशी सोबत बैल व त्यामागे लावलेला घरातलाच एक गुराखी. मोठी माणसे सतत मोठया कामात त्यांना हे काम परवडण्यासारखे नव्हते. म्हणूनच घरातील जाणत्या मुलाची हया कामावर नेमणूक. तो दहा बारा वर्षाचा झाला की, लावला त्याला गुरांच्या मागे. दिला त्याने शाळेला राम राम!

अशा हया बाळगोपाळांची टोळकी आळी आळीतून गूरे घेऊन बाहेर पडत. भोळया, काळया, पांडया, भुऱ्या, लंगडया, कान्या, गोटया इत्यादी. कोणी म्हणतात, ''नावात काय आहे?'' पण गंमत पहा अशीही नावे बरेच काही सांगुन जातात. प्रत्येकाचे पाळण्यातले नाव फक्त आईबापांनाच माहीत. शेजारची, आळीतली आणि गावातली सर्व लहान थोर हयाच टोपणनावाने ओळखत, हाका मारीत शिवाय ही नावे लक्षात ठेवायला सुद्धा सोयीस्कर. भोळया हा मनाने अगदी भोळा. कुणी कोणतेही काम केव्हाही सांगावे आणि भोळयाने नाही म्हणून नये. काळया हा तर रंगाने काळा आणि पांडया हा तर चांगला गोरा. भुऱ्याचे डोकीवरचे सारे केस भुरकट. लंगडया हा बालपणांपासून लंगडा आणि कान्या हा कानाने कमी म्हणजे थोडा बहिरा.

हया बाळगोपाळांनी रोज सकाळी उठावे. गुरांच्या गळयातले दावे काढावे आणि लावावी आपापली गुरे पुढे बिचाऱ्या गुरांनाही आपला हा नित्यक्रम डोळे पाठ. प्रथम गावाबाहेरच्या तळयातील पाणी प्यावे व शिवार ओलांडून रानावरील गुरचरणीत जावे. चांगली उन्हे जाणवू लागली की, परत घरच्या मार्गाला लागावे. परत येताना पुन्हा तळयात पाणी पिणे यथेच्छ डुंबणे व मग घरी दुपारी गोठयात रवंथ. पुन्हा दुपारी दोन वाजता तोच

नाताळच्या व नविन वर्षाच्या
शुभेच्छा

फ्लोरियन रॉड्रिग्ज
रांबाय

मारिया प्रिंटर्स
फोन नं.: २४१४८१३
लग्नपत्रिका, ग्रिटिंग कार्ड,
एनवलप, फर्स्ट कम्युनिअम कार्ड,
बिलबुक, चलनबुक, व्हीजिटिंग कार्ड,
छापुन मिळतिल
एनवलप होलसेल भावाने मिळतिल
पार्क व्ह्यू बिल्डींग, दुकान नं ७, अनुपम बुक सेंटरच्या बाजुला, नालासोपारा (प.)

नाताळ सणाच्या
व नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा

**श्री. बॅप्टीस्ट व**
**सौ. निर्मला वाझ**

'लोब्रोन',
दारसेंग, नवाळे.

नाताळ सणाच्या
व नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा

**श्री. आलेक्स व**
**सौ. ग्रेसी रिबेलो**
**नितीन व जसिका**

'जॉना व्हिला',
चौकाळा, निर्मळ.

नाताळ सणाच्या
हार्दिक शुभेच्छा

**मारिया प्रिंटर्स**

नालासोपारा (प.)
फोन: 2414813

तृतीय स्मृतीदिनानिमित्ताने
एक आठवण

**स्व. एण्ड्रयू फ्रन्सिस रिबेलो**

: देणार :
लिओ, ललिता,
लेरॉय, लॅन्सी

ठरलेला कार्यक्रम दिवस मावळतीला टेकला की फिरविली तोंडे घरच्या वाटेला.

गुरचरणीत गेल्यावर प्रत्येक आळीची गुरे वेगवेगळी. नाहीतरी सारे रान त्यांच्याच बापाचे. कधी चरत, कधी फिरत, कधी हुंदडत तर कधी हंबरत. कधी मधी शिंगाची टकराटकरी. म्हणून नीट लक्ष दयावे लागे. नाही तरी हयांना दुसरे आहे काय? मिळाला रिकामा वेळ की मांडला खेळ! त्यांचे रोजचे हे खेळ हंगामी ठरले. कधी गोटया तर कधी सागरगोटया कधी लगोऱ्या तर कधी कुस्ती चिकोटी तर कधी विटी दांडू. कधी कधी तर वेगळीच करमणूक, आंब्याच्या दिवसात कच्च्या कैऱ्या व मसाला चटणी. अधूनमधून वाडीत पडलेल्या नारळाचे गुळ खोबरे आणि वालपापडीच्या हंगामात बांडी भाजणे, उकड अंडी, गोड, आंबट, तिखट, तुरट, मज्जाच मज्जा! अशी मजा काय शाळेत मिळणार आहे?

शिवारातील गवणीच्या दोन्ही अंगास हंगामात वालाची भरगच्च शेते दिसत. अशा राखलेल्या शेतात ही टोळधाड एकदा पडली की, फक्त दहा मिनिटात दोन बांडया भरतील इतक्या शेंगा तयार. बाळूकाकांच्या शेतातील शेंगा पाहून आमच्या टोळीच्या तोंडाला पाणी सुटे. म्हणून आज बेत पक्का ठरला. गुरे गुरचरणीत चाराला लावली आणि मसलन शिजली. गोटया, लंगडया व कान्या यांनी त्यांच्या ऐपती प्रमाणे सर्वांच्या ढोरांवर नजर ठेवायची व काटकया गोळा करुन ठेवायच्या हे काम. भोळयाने कुणाच्या तरी वाडीत बांडया पाहिल्या होत्या; म्हणून तो आपणहुनच म्हणाला. ''मी आणतो दोन बांडया. मीठ व आगपेटी पण आणतो.'' काळया, पांडया व भुऱ्या हे पक्के बिलंदर! बाळुकाकांच्या शेतातून शेंगा त्यांनी आणायचे ठरवले.

जो तो आपापल्या मूलूखगिरीवर निघाला. काळया, पांडया व भूऱ्या बाळुकाकांच्या शेताजवळ पोहोचले पण आज नेमकी आफत! आज नेमके बाळुकाका आपल्या शेतातील वालावर लक्ष टाकायला आले होते. ते आता येथून गेल्याशिवाय आपले काम फत्ते होणार नाही, असा पोक्त विचार करुन मंडळी झाडी आड लपून बसली. बरे झाले. बाळूकाका चारी बांधावरुन फिरले आणि घरच्या मार्गाला लागले. तेव्हा ही टोळधाड बाहेर पडली पण एकदम शेतात शिरायला हिंमत होईना. रस्त्याने अधून मधून माणसांची येऱ्जा चालू होती, म्हणून त्यांनी भुऱ्याला रस्त्यात उभा केला व काळया, पांडया शेतात शिरले. दोघांनी धोतराच्या ओटीत आणि डोकीवरच्या टोपीत मावतील एवढया रोंगा ओरपल्या व झटपट गुरचरणीत पोहोचले. पाहतात तर लंगडया ढोरांजवळ आणि कान्या व गोटया काटकया गोळा करीत आहेत.

भोळयाही आपल्या नेमलेल्या कामाला गेला होता पण भोळया हा आमचा जन्माचा भोळा! तो नेमका बंडयाबाबांच्या तावडीत सापडला. त्यांची बैलगाडी शिवारातील गवणीत उभी होती. ते कोणाची तरी वाट पाहात होते. इतक्यात भोळया नेमका तेथे आला. बंडायाबाबाने त्याला हात केला, जवळ बोलावले व सांगू लागले ''मी तो शेतावर असलेला चाऱ्याचा भारा घेऊन येतो, तोवर आपल्या गाडीच्या बैलांपुढे उभा राहा'' भारा आणून गाडीत टाकेपर्यंत भोळया तेथे उभा राहिला. नंतर भोळया बाबूकाकांच्या वाडीजवळ पोहोचला. रहाटाच्या जवळपास प्रथम नजर टाकली आणि सामसूम पाहून रहाटावर वईमध्ये लपवून ठेवल्या आणि पुढच्या कामगिरीवर निघाला. अजून मीठ व आगपेटी मिळवायची होती, म्हणून तो जवळच नानी डोकरीच्या घरी गेला. ती बिचारी घरात एकटी, कधी काही लागले तर तिची मोठी पंचाईत होई. मग कुणाची तरी ती गयावया करी. आज तिला दुकानातून साखर हवी होती.

इतक्यात भोळया नेमका तेथे पोहोचला. तिला खूप बरे वाटले. ''अरे भोळया, माझे एक काम कर रे, हे चार आणे घे आणि दुकानातून अर्धा शेर साखर घेऊन ये.'' त्यावर लगेच भोळया म्हणाला. ''नानी डोकरी, मी तुझे काम करतो पण माझे एक काम करशील?'' तीने होकार दिला. तशी भोळयाने घूम ठोकली. दहा मिनिटात साखर

आणून दिली आणि म्हणाला, ''आता मला थोडे मीठ व आगपेटी दे. मात्र कोणाला सांगू नको हो'' नानी डोकरी काय समजायची ती समजली. म्हणाली, ''मीठ देते, आगपेटी पण देते पण माझी आठवण ठेव हो'' भोळया काय समजायचे ते समजला.

शेवटी दोन बांडया, मीठ व आगपेटी घेऊन धापा टाकीत भोळया ठिकाणावर पोहोचला. सगळेच रागावले होते पण भोळयावर रागावून तरी काय उपयोग? आणि राग काढायला वेळ होता कुठे? भराभर त्या शेंगा बांडयात कोंबल्या, मधून मीठ टाकले व तोंडे बंद करुन रचलेल्या काटक्यात नीट मांडल्या आणि दिली आग पेटवून. नाही तरी निदान अर्धा तास वेळ लागणार होता. ''एकदा शेंगा भाजल्या की आरामात बसू आणि सावकाश खाऊ पण त्या आधी लांब गेलेली आपली जनावरे एकत्र आणलेली बरी.''

गोटया व कान्या हया जोडला त्या कामावर पाठविले. त्यांनी गुरे आणली पण त्यात भोळयाच्या दोन्ही म्हशी नव्हत्या. जवळपास शोधून झाले पण कुठेच पत्ता लागेना. भोळया गांगरला. शोधत पुढे निघाला. तो राजोडीच्या रानावर आला. तेथे एकाने म्हशी कळंबच्या बाजूने गेल्याचे सांगितले. लंगडया व कान्याला शिव्या देत भोळया कळंबच्या रस्त्याला लागला. धावत पळत भोळया कळंबच्या गावात पोहोचला. तेथे चौकशी करीत तो म्हशी होत्या तेथे पोहोचला. म्हशी पाहून त्याला हायसे वाटले. म्हशींच्या पाठीवर माराचे बरेच वळ दिसले. त्याने रडून खूप गयावया केली तेव्हा त्या दोन म्हशी मिळाला. रडत पडत, सर्वांचा उद्धार करीत व काठीचे करके म्हशींच्या पाठीवर मारत भोळया कमाबसा रानावर आला.

शेंगा भाजल्या होत्या. सर्वांनी चांगलाच ताव मारला होता. शेवटी त्याचा वाटा बांडीत भरुन, लंगडया व कन्या यांच्यापाशी देऊन बाकी सर्वजण घरी गेले. रागावलेल्या पण भेदरलेल्या भोळयाला तेवढाच त्यांचा आधार वाटला म्हशी घेऊन सर्वजण शिवारात उतरले. लांबून कोल्हे कुई कुई करत होते. म्हशी दिसत नव्हत्या. ''रातही काळी आणि म्हशी ही काळया!'' ते मोठमोठयाने आवाज काढीत रस्ता कापीत होते. इतक्यात त्यांना दुरुन कोणी तरी कंदील घेऊन येताना दिसले. ते नक्कीच भोळयाचे बाबा होते. ते ''भोळया भोळया'' अशा खूप मोठयाने हाका मारीत होते. भोळयाने ही ''आलो आलो'' असा आवाज दिला.

जवळ आल्यावर बाबा रागावून म्हणाले ''. ….. , म्हशी टाकून तू कुठे गेला होतास? तू आता घरी तर खरा, चांगली चामडीच काढतो तुझी आणि वर उपाशी ठेवतो.'' भोळया बिचारा काय बोलणार? वालाच्या शेंगा खायच्या राहू दे पण बाबांची बोलणी खायची मात्र पाळी आली. दुसऱ्या दिवशी मित्रांकडून थोडीफार सहानुभूती तर नाहीच पण त्या दिवसापासून गावभरचे सर्वजण चिडवू लागले.

''भोळयाच्या म्हशी कळंबला!, भोळयाच्या म्हशी कळंबला!''

*****

*“अलौकिक व्हायला माणसांत काय हवे? पैसा? छे! नुसती श्रीमंती म्हणजे साठलेल्या तळयातले पाणी. विद्वत्ता? विद्वत्ता म्हणजे पोकळ नगारा! मोठया आवाजापेक्षा जगाला त्याचा काय उपयोग? कीर्ती? सौंदर्य? छे! त्याजागी शक्ती हेच त्याचे खरे अलौकिकत्व!”*

*— वि. स. खांडेकर*

# नातं

जोसेफ तुस्कानो, गास

*दैनिक जीवन जगताना छोटयामोठया गोष्टींचा अवलंब करताना, वैज्ञानिक विचारसरणीचा अवलंब केला तर पत्नी-पत्नीतील नातं सुटू शकते.*

*संसाराचा रथ गतीशील ठेवताना तनासोबत मनाचीही मशागत होईल याची खात्री नवरा-बायकोंनी परस्परासाठी करुन घ्यायला हवी. आजच्या बदलत्या काळात, भराभर बदलणाऱ्या नातेसंबंधाच्या रुढी-पदधृती नि त्यात भर पडणाऱ्या वैज्ञानिक प्रगतीची फळे म्हणजेच विविधोपयोगी साधने वगैरे. तेव्हा, खूप सांभाळून घ्यावे लागेल एकमेकांना, याचा विज्ञानमंत्र देणारी ही कथा.*

स्टुलावर चढून शामने कपाटावरचं बॉक्स बाहेर काढलं. त्यात त्याच्या जुन्या डायऱ्या खच्चून भरलेल्या होत्या. आज तो घरात एकटाच होता. तन्वी कुणा मैत्रिणीच्या घरी गेली होती. जयू कॉलेजच्या पिकनिकला गेली होती. सुट्टीच्या दिवशी क्वचितच घरी असणारा शाम, खूप एकाकी झाल्यागत घरात वावरत होता. त्याचा मुडदेखील अपसेट होता. अशावेळी तो हेच करायचा, स्टूल घेऊन जुन्या डायऱ्यांचं गाठोडं बाहेर काढायचा, भराभर डायऱ्या चाळायचा, जुने प्रसंग त्याच्याभोवती फेर धरायचे. कधी अस्फुटसे हसू ओठावर उमटायचे, कधी डोळे पाण्याने भरुन यायचे. त्याच्या एकटेपणाला त्या जुन्या आठवणी जोजवायच्या. तेव्हा त्याचं जडावलेलं मन हलकं व्हायचं. वाईट घटना विसरुन जाण्याची ताकद चांगल्या जुन्या आठवणीत असते, याचा पुन्हा एकदा प्रत्यय यायचा.........

आजही त्याने बॉक्समधली डायरी उचलली. सोफ्यावर बसत टीपॉयवर पाय ठेवले. डायरी उघडणार तोच त्याची नजर खिडकीजवळ गेली. नेहमीची ती कबुतरांची जोडी त्याच्या नजरेस पडली. त्याचं ते एकमेकांना गोंजारणे, चोचीत चोच घालणे, एक दुसऱ्याच्या पंखाखाली (खुशीत) घुसणे, गुटर्र ऽऽ घू ऽऽ करणे......... तो स्तब्ध होऊन काहीवेळ पाहतच राहिला. अचानक मुग्धाची आठवण त्याला झाली. भानावर येत मान झटकत त्याने डायरी उघडली................मन भुतकाळात डुबून गेले.

''तनू, तूला माझ्यातलं नेमकं काय आवडते?'' राजोडीच्या समुद्रकिनाऱ्यावरील वाळूत पाय पसरुन बसताबसता शामने तन्वीला एकदा विचारले होते. ''पहिल्यांदा तु मला सांग, मी तुला का आवडते?'' तिने त्याला विचारले. तेव्हा तिच्या खटयाळपणातला हट्टी आग्रह त्याला जाणवला होता. पण ओठावर स्मित राखीत तो म्हणाला होता, ''मी सौंदर्याचा उपासक अन् मला तुझं सौंदर्य खूप आवडलयं. मी भाळलोय तुझ्या सुंदर रुपावर!'' तिच्या आरक्त चेहऱ्याने त्याच्या स्तुतीसुमनांना दाद दिली, शाम खूप खूष झाला. तो पुढे म्हणाला ''पण, मी तर असा नावाप्रमाणेच निग्रो रंगाचा. आपली जोडी बेजोड नाही वाटत, तुला.''

''मला ते काही माहित नाही, तुझं बोलणं मला आवडतं. तुझे शब्द मला खूलवतात. तू मला हसवतोस, तेव्हा मी तुझी झालेली असते अन् हे पुन्हा पुन्हा 'तुझं होणं' घडताना, आता मी सर्वस्वी तुझी व्हायला निघालीय.'' त्यावेळी त्या सुंदर सायंकाळी आकाशातली सगळी नक्षत्रे आपल्या डोळयात उतरलीयत अन् चंद्र तिच्या डोळयात विसलत असल्याचा भास झाला होता. कधी कधी तन्वी इतकं सुंदर बोलायची की तो नुसता गप्प बसून ऐकायचा. तिच्या स्वभावाची त्याने फारशी पारख केली नव्हती. तरी, आपल्या शब्दसामर्थ्यावर त्याचा खूप भरवसा होता. तिच्या सुंदर देहात एक

निष्पाप, निरपेक्ष नि भोळया मनाची उभारणी आपण करु शकू याची त्याला खात्री होती.

त्यासाठीच तो तिला सतत पत्रे लिहायचा. शाम कुणी कवी नव्हता, लेखक नव्हता की शास्त्रज्ञ नव्हता. एका ख्यातनाम एअरलाईन्स कंपनीत सी. ए. म्हणून मानाची जागा भुषवित होता. तो वृत्तीने एका तरुण समाजसेवक होता. कुठल्याही गोष्टीकडे तो वैज्ञानिक दृष्टीकोनातून पाहायचा. निरिक्षण, तर्क व निल्कर्ष या त्रिसूत्रीवर त्याच्या विचारांची बैठक असायची. त्यातून तो आपले निर्णय घेत असे. तिला पत्रातून कळवित असे. त्यात त्याचा काही मार्गदर्शन वगैरे करण्याचा आग्रह नव्हता. त्याला फक्त शेअरिंग करायचं होतं. .......दिवस असेच लोटले होते. लग्न करुन दोघांची संसार मांडला होता. पण, काही प्रसंग असे घडले की हळूहळू, शाम मनाने तन्वी पासून दुरावून गेला. त्याची मानसिकता समजण्याची कुवतच तिच्या ठायी नाही, या मताला तो येऊन पोहोचला. खूप खंतावत राहयला. मनाच्या एकटेपणा पायी बऱ्याचदा वेडापिसा झाला. तेव्हा, मुग्धाने त्याला आधार दिला. शामची मानसिक भुक अचूक ओळखणाऱ्या मुग्धाला, तो जिवलग मैत्रिण मानून राहयला. पण, त्याने तन्वीचा तिटकारा मात्र केला नाही. आपली पत्नी म्हणून तो तिच्या गरजा भागवित असे. तिला काही मानसिक गरजा आहेत, याचा ती काही अंदाज लागू देत नव्हती. बऱ्याचदा तो त्यामुळे गोंधळूनही जायचा. त्याला तन्वीला सुखी ठेवायचं होतं अन् मुग्धाची मैत्रीदेखील हवी होती. त्यासाठीच, त्याने तन्वीला पत्र लिहिण्याचा निर्णय घेतला होता.

प्रिय तन्वी, आज तुला चिठ्ठी लिहण्याचे ठरविले.......खूप दिवसानंतरची चिठ्ठी, नाही का? लग्नाआधी खूप पत्रे लिहिली होती, ती आठवतात ना? सध्या, तुझ्या खूपशा तक्रारींचे निवारण करताना आपली खडाजंगी उडते. मला पूर्ण बोलू न देता, तू तुझंच घोडं दामटत असते. पटकन आक्रस्ताळी पावित्रा घेतेस. मी तुझ्याशी संवाद साधण्याचे बेत करतो नि केवळ वादच होत राहतात. तुझा आक्रस्ताळेपणा अन् माझी झटकन रागावण्याची सवय यामुळे मला जे सांगायचं आहे ते अर्धवट राहून जाते. तुझ्या शंकाचे समाधान करण्यास वाव मिळत नाही. तेव्हा हा पत्रप्रंपच; खूप खूप दिवसानंतरचा.

आता परवाचीच गोष्ट घे ना, सकाळी जयू शाळेत गेली, काहीच न खातापिता. मी तुला विचारलं की तु तिला उपाशीपोटी कसं जाऊ दिलंस? तू म्हणालीस, ती नेहमी हट्ट करते नि ब्रेकफास्ट न करता शाळेत जाते. डब्यातदेखील खायला नीट नेत नाही. कपडे धुता धुता तू सहजपणे सांगत होतीस. पोर दुपारपर्यंत उपाशी राहते, हे तुझ्या मातृहृयाला कसं काय सहन होतं? मुलीला बाबा-पुता करुन चांगल्या खाण्यापिण्याच्या सवयी लावणे, हे तुझं कर्तव्य आहे. तिच्या शाळेत जाण्याचा वेळ तू तिच्यासाठी घालवायला पाहिजे. त्याऐवजी घाईघाईत घरकामे उरकायची म्हणून धुणेबिणे करण्यात गुंतून जाते. मुलीच्या हातात पैसे टेकवून तु स्वतःचे कर्तव्य भागवून घेतेस. त्यामुळे पोरीला बाहेरचं अरबट-चरबट खायची सवय लागेल. त्याऐवजी तू स्वतःच्या हातचं साधं, घरगूती पदार्थ करुन तिला खायची सवय लावायला हवी. तुझ्या वात्सत्याची व मायेची ती खरी कसोटी आहे. पण तुला बी हौस नाही. तुला हे सांगितलं तेव्हा तू चिडलीस, तुझं तत्वज्ञान तुझ्याकडेच ठेव, असं म्हणालीस. यात कुठलं आलयं तत्वज्ञान? दैनिक जीवनातला साधा वैज्ञानिक दृष्टीकोन आहे तोच तुला मी सांगितलं, एवढचं.

मी पटकन वाईटाला वाईट संबोधत नाही, हे तुला बऱ्याचदा खूपते. एखाद्याला पटकन दोष देणे मला मुळीच जमणार नाही. एखादा माणूस वाईट का वागला याची पार्श्वभूमी न कळता, त्यांची कारणीमिमांसा न करता त्या वागला याची पार्श्वभूमी न कळता, त्यांची कारणीमिमांसा न करता त्या माणसाला दोष देणे कितपत योग्य आहे? खूपदा माणसं परिस्थितीची शिकार असतात, याचं

आपण भान ठेवलं पाहिजे. नेमकं तूला तेच पटत नाही, त्याला मी काय करु? तुझ्या शब्दात म्हणायचं तर माझं आणखी एक तत्वज्ञान तुला आवडत नाही. ते म्हणजे आपण कधी कुणावर उपकार करत नसतो. जे काही आपण दुसऱ्यांसाठी करतो ते मुळात स्वत:च्या आनंदासाठी करीत असतो. मग परतफेडीची अपेक्षाच मुळी कशीतरीच वाटते. कुणी कसं वागावं हा ज्याच्या त्याच्या अख्यतारीचा प्रश्न आहे. कुणाच्या मनोप्रांतात हस्तक्षेप करण्याचा अधिकार आपल्याला कुणी दिलाय? माझी ही तत्वप्रणाली तुला मुर्खपणाची वाटते खरी, पण मी माझ्या मनाशी प्रतारणा कशी काय करु? त्यातच लोक आपल्याला फसवतात ही भावनादेखील नेहमी सत्य नसते. जे खरोखर फसवतात ते मुर्ख असतात असं आपण समजायचं नि त्यांच्याकडे दुर्लक्ष करायचं.

अग, जीवनात सगळया बाबतीत आपल्याला यश यायला पाहिजे हा आग्रह कशाला? थोडेफार चढउतार असणारच! कधी कुठे नि कुणी नुकसान केलं तर ते सहन करण्याची हिंमत असायला हवी. आपण मोठया यशाची अपेक्षा करतो, तेव्हा त्याची किमंत आपल्याला किंवा आपल्या माणसाला चुकवावी लागते हे लक्षात घ्यायला हवे. शिवाय एखादी गोष्ट हौसेने करण्यात जे समाधान असते ते मोठमोठया यशात नसते. नुसतं आपलं घर स्वच्छ नि टापटिप ठेवलं तर आपण इतरांच्या प्रशंसेचा विषय होतो. ही छोटीशी हौसदेखील मन: पुर्वक, कर्तव्यबुदध्ीने पार पाडली तरी तुझ्यासारख्या गृहीणीला कितीतरी श्रेय मिळू शकते. त्यासाठी मोठं पद, खूप पैसा किंवा मानवरातब पाहिजे असं नव्हे..

मी तर म्हणतो की माणसाच्या ह्रदयाचे अंतराळ हाच या जगण्यातला स्वर्ग असतो. मानवी ह्रदय जितकं विशाल, तेवढा तो माणूस जगण्यातलं सुख लुटत राहतो. जे काही घडतं, ते भल्यासाठीच अशी मनोभावना दृढ झाली की जीवनातले चढउतार अनुभवताना क्लेश होत नाहीत. तेव्हा, एखादया घटनेचा दुसऱ्या घटनेशी संबंध जोडण्याचा उपद्व्याप करायचा कशाला? जे घडते ते आपल्या भाग्यातलं असते. ते दुदैवी असो वा सुदैवी, त्याला माणूसकी जोपासून सामोरे जाणे महत्वाचे असते.

आणखी मुद्दा, लक्षात घे, तो म्हणजे एखादं काम सांगून कुणीही करु शकतो. खरं म्हणजे न सांगता एखादी कृती करण्याची हौस बाळगणे हयातूनच माणसाची क्रमशीलता दिसून येते. त्याचप्रमाणे पुढच्या माणसाने आपल्याला न सांगताच त्याच्या भावना आपल्याला कळणे यास वेव्हलेंग्थस् जुळणे म्हणतात. आमच्या ऑफीसात रिसेप्शनीस्ट म्हणून कामाला असलेल्या मुग्धाचं नि माझं भावनिक नातं यातूनच निर्माण झालं. आता मानवी नातं हे केवळ मनाशी निगडून राहात नाही. कारण मनाशिवाय शरीर हे मृत देहासम असते; तसेच शरीरबिना मन हे भूतासारखे असते. आज प्रेमाची परिभाषा बदललेली आहे. प्रेमसंबधाचे स्वरुप बदलली आहेत. बंधने शिथील झाली आहेत तरीही तुझं वागणं पाहिले की भारतीय माणसाच्या गाभ्यात क्रांतीकारक फेरबदल घडून आलेले नाहित हे जाणवते. अग, आपला नवरा मनाने कुणाचातरी होतो हाच बाईचा पराभव असतो. तिथे शरीर संबंधाचा कांगावा बिलकुल फिजूल ठरतो.

माणसाचा स्वभाव बदलत नाही, म्हणतात. पण तू बदलावें असं मला मनापासून वाटते. तू बदलली नाहीस, तर मला तडजोडी कराव्या लागतील, त्यालाही काही मर्यादा असतील त्यातून येणारे नैराश्य मला जीवनातल्या अर्ध्या रिकाम्या पेल्याची जाणीव करुन टोचत राहिल. आपलं कुणीही नाही नि आपण कुणाचे नाहीत, हे कटूसत्य स्विकारणे किती जड असते. ते तर माझ्यासारख्या संवेदनाक्षम माणसाला मृत्युचा ध्यास घ्यायला लावतील......... इतकंच!

तुझा जीवन (सा) रथी

**शाम**

*****

# माहिती तंत्रज्ञान युग

श्री. फ्रान्सिस अलमेडा, नंदनवन

माहिती तंत्राज्ञानचे (Information Technology) महत्व आज प्रचंड प्रमाणात वाढले आहे. भविष्यकाळात ते अधिक फोफावणार आहे. सर्व मानवी जीवनाला हे माहिती तंत्रज्ञान व्यापून उरणार आहे. माहिती तंत्रज्ञानाचे महत्व देशविदेशातील सरकारांनी ओळखले आहे. त्यामुळे सर्वत्र या तंत्रज्ञानासाठी मोठ्या प्रमाणात संपत्ती व शक्ती यांचा वापर केला जात आहे. ज्या देशांचे प्रभुत्व या तंत्रज्ञानावर असेल ते देश पुढे जातील.

माहिती तंत्रज्ञान म्हणजे माहितीच्या प्रसारणाचे, देवाणघेवाणीचे तंत्रज्ञान होय. या तंत्रज्ञानाचा उदय मानवाला जेव्हा बोलण्याची कला साधली तेव्हाच झाला. बोली भाषेतून प्रथम माहितीची देवाणघेवाण सुरू झाली. माणुस आपले अनुभव, ज्ञान, सुख-दु:ख दुसऱ्यांपर्यंत पोहचवायला लागला आणि माणसाची सामुहिक शक्ति, बुद्धी कार्य करायला लागली. शिकारीकडुन शेतीकडे माणसाची वाटचाल झाली. भटक्या टोळ्यांतून शासन व्यवस्था आली ती बोलण्याचा कलेमुळे! पुढे बोललेले लिहिण्यास सुरूवात झाली. बोलीभाषा फक्त लहान समुदायापुरता कार्य करीत होती, वर्तमानकाळातच प्रभावी होती. लेखी भाषा स्थळ, काळ यांच्या पलिकडे पोहचली. लेखन कलेने मानवाचे सामर्थ्य अनेक पट वाढले. माहितीची देवाणघेवाण सुरू झाली. भुतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ यांना लेखी भाषेने जोडुन टाकले. इतिहास, भुगोल, विज्ञान यांची प्रगती सुरू झाली.

कालांतराने छापण्याच्या कलेचा शोध लागला. हाताने लिहिण्याऐवजी यंत्राने लेखन-काम आपल्या हातात घेतले. माहिती तंत्रज्ञान आणखी प्रगत झाले. पुस्तके, नियतकालिके, लिखित साहित्याच्या निर्मितीने साहित्य, शास्त्र, कला यांना प्रचंड गती मिळाली. मानवाच्या सर्व जीवनावर या तंत्रज्ञानाचा दूरगामी परिणाम झाला. प्रचंड साम्राज्ये, मोठमोठी सशस्त्र दले, मोठया प्रमाणात उत्पादन करणारे कारखाने हे या माहिती युगाचे परिणाम होते, त्यामध्ये विज्ञानाने अधिक भर घातली, टेलिग्राफ, टेलिफोन, रेडिओ आणि टेलिव्हिजन या शोधांनी माहितीची देवाणघेवाण अतिशय जलद व सोपी केली. माहिती तंत्रज्ञानासाठी मानवाची मोठी साधनसंपत्ती वापरली जाऊ लागली त्याबरोबरच जीवनाची सर्व क्षेत्रे या तंत्रज्ञानाने व्यापून टाकली.

कॉम्प्यूटरच्या शोधाने माहिती तंत्राज्ञानात क्रांतीच घडवून आणली. माहितीचे संकलन करणे व वर्गवारी करण्याची कॉम्प्युटरची क्षमता मानवी बुद्धीच्या मानाने प्रचंड आहे. कॉम्प्यूटरचे हे सामर्थ्य टेलिफोनच्या जाळयाशी जोडले की तयार होते इंटरनेट-माहितीचे जाळे! या जाळात सारा मानव समाज गोवला जात आहे. प्रत्येक माणसापर्यत या जाळयाचे टोक पोहचणार आहे. त्यामुळे कोणतीही माहिती कोणालाही मिळणे सहज शक्य होणार आहे. खऱ्या अर्थाने सर्व मानव एक होणार आहे. ज्ञानाची ही देवाणघेवाण आपण जितक्या लवकर व सुलभतेने करायला सुरुवात करु तितकी आपली झपाटयाने प्रगती होणार आहे. ''जो जे वांछिल तो ते लाहो'' हे ज्ञानेश्वरांचे स्वप्न साकार होण्याचे दिवस जवळ येत आहेत.

फार पूर्वी श्रमशक्ती महत्वाची मानली जात होती. शेतीप्रधान संस्कृतीमध्ये जितके कष्ट अधिक तितकी संपत्तीमध्ये वाढ होई. औदयोगिक क्रांती झाली आणि उत्पादकता व साधनांना महत्व आले. नवनवीन यंत्रे, उपकरणे वापरुन उत्पादन वाढवण्यावर भर देण्यात आला. आजच्या काळात माहिती ज्ञान ही साधने जीवनाचे नियंत्रण करु लागली आहेत. मानवाच्या ज्ञानात सतत नवी भर पडत आहे. त्या ज्ञानाचे वितरण व वापर जितके जलद होईल तितके ते प्रभावी ठरत आहे. नवीन माहिती-ज्ञान निर्मिती आणि त्यामुळे माहितीचे तंत्रज्ञान अधिकाधिक प्रभावीपणे वापरणे ही

अत्यावश्यक बाब ठरली आहे.

माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात आज मोक्याच्या जागी संगणक विराजमान झाले आहे. अधिकाधिक सामर्थ्याचे संगणक आणि त्याचा अधिक कौशल्याने वापर करणारी सॉफ्टवेअर (आज्ञाप्रणाली) तयार करणारी मंडळी ही हया माहिती तंत्रज्ञानाची सूत्रधार आहेत. आपल्या देशात संगणक प्रशिक्षित मनुष्यबळ मुबलक आहे. त्यामुळे माहिती तंत्रज्ञान युगातील आघाडीचा देश बनण्याची आपल्या देशाची क्षमता आहे. चालून आलेली संधी वापरण्यासाठी सर्वत्र जोरदार हालचाली सुरु झाल्या आहेत. परंतु या संधीचा फायदा घेण्यासाठी संगणक क्षेत्राचा सर्वांगाने अभ्यास केला पाहिजे. इंटरनेटवर निर्विवाद प्रभुत्व प्रस्थापित केले पाहिजे.

अवकाशाच्या पोकळीत एक सायबर साम्राज्य उदयाला येत आहे. या साम्राज्याला राष्ट्र, धर्म, काळ कसलेच बंधन नाही मानव खऱ्या अर्थाने एक होऊ पाहात आहे. या माहितीच्या महाजाला मुळे मानवाच्या बुद्धीचे सामर्थ्य व पल्ला हजारोपटीने वाढला आहे. अमेरिकेतील एका शहरात असणारा वैदयकीय तज्ञ आफ्रिकेतील रुग्णावर उपचार करु शकणार आहे. त्याच्यावर शस्त्रक्रियाही करु शकणार आहे. आताच अमेरिकेत टेलीमेडिसीन देणारे दवाखाने सुरु झाले आहेत. काम करण्यासाठी घर सोडून जाण्याची गरज नाही. घरातल्या घरात देशविदेशातील कोणत्याही कंपनीचे काम तुम्ही करु शकाल इंटरनेट तुमचे काम मालकापर्यंत पोहोचविणार आणि तुमचा पगार तुमच्या बँकेत नेऊन ठेवणार आहे. मग तुम्हाला घराच्या बाहेर पडण्याची गरज काय?

भविष्यात येणारे जग हे मानवाच्या सर्व स्वप्नपूर्तीचे जग असेल आणि तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे मानव जवळजवळ अमर होईल. संगणकाच्या सर्वगामी सामर्थ्यामुळे सर्व श्रमाची कंटाळवाणी कामे मानवाला करावी लागणार नाहीत मग मानवापूढे काम कोणते उरेल? साहित्य, शास्त्र, मनोरंजन, संशोधन, खेळ यासाठीच सारा मानव समाज जगेल.

पुढे येणाऱ्या या युगात नितीमुल्यांची अधिक गरज लागणार आहे. मूल्याधारित मानव समाजच या नव्या युगात जगेल व वाढेल. मुल्याअभावी विनाश अधिक वेगाने होईल. माहिती घेणाऱ्याची व देणाऱ्याची विश्वसनीयता हा या युगाचा पाया असेल. फार मोठे विश्व व्यापी घोटाळे व फसवणूकीचे प्रकार हे या माहिती युगाची देणगी ठरण्याची शक्यता आहे. म्हणूनच या युगात जीवंत राहयचे असेल तर जास्तीत जास्त लोक मुल्यसंस्कार झालेले असले पाहिजेत. त्यासाठी आपले मुल्यशिक्षण प्रभावी ठरु शकते. शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट केलेली - पुढील दहा मूल्ये आपल्या जीवनात आपल्याला मार्गदर्शक ठरावीत.

१. श्रमप्रतिष्ठा : कोणतेही काम तुच्छ लेखू नये.

२. राष्ट्रभक्ती : आपला देश, समाज संस्कृती यांचा अभिमान असवा.

३. स्त्री-पुरुष समानता : स्त्रियांना व पुरुषानां समान लेखणे.

४. सर्वधर्मसहिष्णूता : विविध जातीधर्माचा सन्मान करणे.

५. राष्ट्रीय एकात्मता : सर्व जाती, धर्म, प्रांत, पंथ, यांसाठी समतेची भावना असणे.

६. वैज्ञानिक दृष्टीकोन : अंधश्रद्धा न बाळगणे, विज्ञानाची आवड बाळगणे.

७. संवेदनशीलता : गरजवंतास मदत करणे, निसर्गाची आवड असणे.

८. सौजन्यशीलता : वडिलधाऱ्यांचा आदर असणे. सामान्य शिष्टाचार पाळणे.

९. वक्तशीरपणा : प्रत्येक काम वेळच्या वेळी करणे.

१०. नीटनीटकेपणा : सुसंगतपणा असणे, स्वच्छतेची आवड असणे.

या मूल्यांद्वारे माहिती युगाला सामोरी जाणारी पिढी घडविण्याची जबाबदारी आपली आहे.

# मूतखडा

डॉ. नितिन वाळिंजकर, समेळपाडा.

मूतखड्याचं नाव काढलं मी डॉक्टर असूनदेखील माझ्या मनात धस्स होतं, कारण मुतखडा झालेल्या रूग्णाचं असहय वेदनेने विव्हळणं चटकन डोळ्यापुढे येते. हा मूतखडा का होतो? कुठे होतो? त्याची लक्षणे कोणती? त्यामुळे आपल्या शरीरावर कोणते दुष्परिणाम होतात? या विषयी थोडक्यात माहिती -

**(अ) मूतखडा होण्याची कारणे -**

१) 'अ' जीवनसत्वाच्या अभावामुळे आतील पेशींची झड होते. झड झालेल्या पेशी एकत्रित साठून त्याचा खडा तयार होतो.

२) उन्हाळ्यात पाणी कमी पिण्यामुळे मूतखडा होतो.

३) लघवीच्या मार्गात अडथळा निर्माण झाल्यामुळे मूतखडा होतो.

४) पॅराथायरॉईड ग्रंथी अती कार्यक्षम झाल्यामुळे लघवीमध्ये कॅल्शियमचे प्रमाण वाढते. त्यामुळे मूतखडा होतो.

**(ब) मूतखड्याचे प्रकार**

१) ऑक्झालेट - याला 'मलबेरी' खडा म्हणतात. याच्या पृष्ठभागावर काटे असतात. यामुळे लघवीवाटे रक्तस्राव होतो. हा खडक टणक असल्यामुळे 'क्ष' किरणांमध्ये (एक्स रे) दिसतो.

२) फॉस्फेट - हा रंगाने सफेद व गुळगुळीत असतो. लघवीत अल्कलीचे प्रमाण जास्त असल्यास हा वेगाने वाढतो.

३) यूरेट - हा टणक आणि गुळगुळीत असतो. हा बहुतांशी एकापेक्षा जास्त प्रमाणात आढळतो - हा खडा 'क्ष' किरणांमध्ये दिसतो.

४) सिस्टिन - लघवीत आम्लाचे प्रमाण जास्त असल्यामुळे हा मूतखडा होतो. हा सुदधा बहुतांशी एकापेक्षा जास्त प्रमाणात आढळतो. हा खडा मऊ आणि गुलाबी किंवा पिवळया रंगाचा असतो.

५) झॅन्थीन - हा खडा गुळगुळीत आणि लाल रंगाचा असतो.

**(क) लक्षणे**

१) वेदना : पंच्याहत्तर टक्के रूग्ण वेदना हे कारण घेऊन येतात. पाठीचा कणा आणि शेवटची बरगडी या मधील कोनाला 'रिनल अँगल' म्हणतात. या 'रिनल अँगल' मध्ये असहय वेदना होतात आणि या वेदना जास्त हालचालीमुळे (उदा. जीना चढताना) होतात. मूतखडा युरेटर (मुत्रपिंड आणि मुत्राशय यांना जोडणारी नलिका) मध्ये असल्यास वेदना कुशीतून जांघेत येतात. या वेदनांमुळे उलट्या होतात आणि अतिशय घाम निघतो. मूतखड्याच्या अंतर्गत हालचालीमुळे या वेदना होतात.

२) लघवीवाटे रक्तस्राव होतात.

३) लघवीवाटे पू येतो.

लघवीत जीवाणूंचा प्रार्दूभाव झाल्यामुळे थंडी लागून ताप येतो.

**ड) मूतखडा शोधण्यासाठी लागणारी तपासणी**

१) 'क्ष' किरण चाचणी - 'क्ष' किरणाद्वारे मूतखडा शोधता येतो.

२) आय. व्ही. पी. - या चाचणीत डाय (एक द्रव्य) नीलेमध्ये टोचले जाते. ही डाय मुत्रपिंड, युरेटर आणि मुत्राशयात एकत्रित होते. याद्वारे मुतखड्याचे ठिकाण व मुत्रपिंडाचे कार्य समजते.

३) सिस्टोस्कोपी - या चाचणीत दुर्बिणीद्वारे मूतखड्याचे ठिकाण शोधले जाते.

**इ) उपाय**

१) वेदनाक्षमक इंजेक्शन आणि गोळ्या देऊन रूग्णांच्या वेदना कमी केल्या जातात. जिवाणूंचा प्रादुर्भाव झाल्यास प्रतिजैवी औषधे

दिली जातात. रूग्णांना पाणी भरपूर प्यायला देतात.

२) शस्त्रक्रिये वाटे मूतखडा काढण्यात येतो.

३) लेझर किरणांद्वारे मूतखड्याचे बारीक तुकडे केले जातात.

४) रूग्णांना पाण्यात बसवून दोन्ही बाजूंनी ध्वनीलहरींचा मारा करून मूतखड्याचे बारीक तुकडे केले जातात.

**ई) मूतखड्याचे शरीरावर होणारे दुष्परिणाम**

१) दोन्ही मुत्रापिंडात खडे झाल्यास लघवीच्या मार्गात अडथळा निर्माण होतो. कालांतराने मुत्रपिंडे अकार्यक्षम होतात (किडनी फेल्यूअर)

**फ) टाळण्याचे उपाय**

१) उन्हाळ्यात भरपूर पाणी प्यावे. त्यामुळे लघवीत जीवाणूंचा प्रादुर्भाव होत नाही.

२) दूध आणि चीज यासारखे पदार्थ खाण्याचे टाळणे. कारण या पदार्थात कॅल्शियमचे प्रमाण जास्त असते.

३) युरेट मूतखडा असलेल्या रूग्णांनी मांस व मासळी खाऊ नये.

४) या रूग्णांनी लघवी अल्कली ठेवण्यासाठी सोडीयम बायकार्बोनेट वापरावे.

५) ऑक्झालेट मूतखडा असलेल्या रूग्णांनी स्ट्रॉबेरीज, प्लम्स खाऊ नयेत. आहारात मॅग्नेशियम क्षारांचे प्रमाण जास्त असावे.

६) फॉस्फेट मूतखडा असलेल्या रूग्णांनी लघवीत आम्लाचे प्रमाण वाढविण्यासाठी अमोनियम क्लोराईड घ्यावे.

७) सिस्टीन मुतखडा असलेल्या रूग्णांनी मांस, मासळी व अंडी यांचे आहारातील प्रमाण कमी करावे. हया रूग्णांनी भरपूर पाणी प्यावे.

**सारांश :**

पथ्ये पाळल्यास मूतखड्याचा त्रास होत नाही.

नाताळच्या व
नवीन वर्षाच्या शुभेच्छा
तसेच
'ख्रिस्तायन'साठी शुभचिंतन

**सौ. अपलन व श्री. आंगस्तीन रिबेलो**
**अल्वीन, आल्वन व अमोल**

'निवान्त' चौकाळा.

नाताळच्या व
नवीन वर्षाच्या शुभेच्छा

**श्री. लूईस परेरा**
पॅरीश कॉन्सिल सदस्य

चौकाळे.

# संगीत - एक अखंड साधना

थॉमस अ. परेरा, तबला विशारद, गास.

**गीतं वाद्यं च नृत्यं च । त्रयं संगीतमुच्यते ।**

गायन, वादन आणि नर्तन (नृत्य) या तीन श्रेष्ठ कला म्हणजे संगीत होय. वादन कलेचे स्वरवाद्यवादन (उदा. पेटी, बासरी, इ.) आणि तालवाद्य वादन (उदा. तबला, मृदुंग, पखवाज इ.) असे दोन उपप्रकार होतात.

भारतीय संगीतास फार पुरातन ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. आदिमानवा पासूनच माणसाने बुद्धी व विचारशक्ती याद्वारे सातत्याने संगीत कलेतही प्रगती केलेली आढळते. संगीत हे माणसाच्या जीवनाचा अविभाज्य घटक आहे. म्हणूनच एका संस्कृत सुभाषितात म्हटलेले आहे.

**साहित्य, संगीत कला-विहीनः ।**
**साक्षात् पशु, पुच्छ विशारण हीन : ।**

(साहित्य किंवा संगीताची आवड नसणारा मनुष्य म्हणजे शिंगे नसलेला खरा पशूच होय)

संगीताचे आधारस्तंभ म्हणजे स्वर आणि लय-ताल. ढगांचा गडगडाट, पाण्याचा खळखळाट, पानांची सळसळ यातून स्वराच्या संकल्पनेचा उदय संभवतो तर सूर्योदय-सुर्यास्त, पृथ्वीचे व ग्रहांचे परिभ्रमण, ऋतूचक्र इ. द्वारे मानवास लयतत्वाचा बोध झाला असावा व आदिमानवास हातांनी टाळी वाजवता येऊ लागली हेच तालाचे उगमस्थान मानावे लागेल. जसजसी मानवाला स्वर-लयीची जाण वाढू लागली तसतसे त्याने या संगीतास पोषक अशी वाद्ये निर्माण करण्याकडे लक्ष केंद्रीत केले. या वाद्यांची निर्मिती नक्की कोणी, कधी व कुठे केली या विषयी जरी निश्चित माहिती उपलब्ध नसली तरीही वाद्यांचा इतिहास हा गायनकलेइतकाच प्राचीन आहे. हल्लीच्या वैज्ञानिक युगातही अनेक इलेक्ट्रॉनिक वाद्ये ही बाजारात उपलब्ध आहेत. वाद्यांचे सुध्दा अनेक प्रकार आहेत. तारेचा वापर करुन वाजणारी वाद्ये म्हणजे तंतूवाद्ये उदा. सतार, संतूर वायोलिन वगैरे. तर हवेचा वापर करुन वाजणारी वाद्ये म्हणजे सुषिर वाद्ये. उदा. पेटी, बासरी, शहनाई इ. चामडयाचा वापर करुन वाजणारी वाद्ये म्हणजे अवनद्ध वाद्ये उदा. तबला, पख्वाज, डफ, ताशा, इ. व भरीव वस्तूच्या आघाताने आवाज निर्माण करणाऱ्या वाद्यास घन वाद्ये म्हणतात उदा. घंटा, झांजा, टिपऱ्या, इ.

**वसईतील संगीत परंपरा**

आपणास कल्पना असेलच की पूर्वी आपल्या चर्चमधे ग्रेगोरीयन चालीवर आधारीत लॅटीन भाषेतील गाणी गाईली जात असत. निरनिराळया आवाजात व्हायोलिनची साथ घेतली जाई. मात्र दुसऱ्या व्हॅटिकन परिषदेनंतर चर्चमधील उपासनेत आमुलाग्र बदल झाला व उपासना स्थानिक भाषेतच असावी असे धोरण स्विकारले गेले.

त्याकाळात फा. हिलरी व त्यांच्या सहकाऱ्यांनी अहोरात्र मेहनत करुन मराठी भाषेत अनेक गीतांची रचना केली. त्यांना चाली लावल्या व गावोगावी किर्तनाचे कार्यक्रम आयोजित करुन गीतांचा प्रसार केला. तसेच काही स्थानिक भाविकांना पेटी तबला शिकण्यासाठी प्रोत्साहीत केले व जीवन दर्शन केंद्रातसुध्दा ही

वाद्ये शिकण्याची सोय उपलब्ध केली. (मी तबल्याचे प्राथमिक धडे याच जीवन केंद्रात गिरविले) हळूहळू ताला सूरांचा मेळ बसला व संपूर्ण वसईतील चर्चमधून भाविक एकाच तालात व सूरात गाऊ लागले. आज मला सांगायला अभिमान वाटतो की आपल्या समाजातील अनेक तरुण तरुणांनी संगीताच्या क्षेत्रात नेत्रदिपक प्रगती केलेली आहे. अनेकांनी स्वत:च्या कॅसेट्स काढल्या आहेत. गायन, वादन, व नृत्य या तिन्ही क्षेत्रात आपली मंडळी आघाडीवर आहेत.

समाजाची संगीताची ही प्रगती जरी सुखावह असली तरीही समर्पित भावनेने या ज्ञानाची उपासना करणारे थोडे आहेत. फास्ट फुडच्या जमान्यात सगळयांना ''पी हळद हो गोरी'' चा ध्यास लागलेला आहे. एका महिन्यात वा वर्षभरात Expert होण्याचा सगळयांचा प्रयत्न असतो. या क्षेत्रात मेहनत व सतत रियाझ याची गरज असते. आपले ज्ञान तपासण्याची, स्वत:ची ''तयारी'' तपासण्यासाठी सतत परिक्षा देणे गरजेचे असते.

अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय, मिरज या विद्यापिठाकडून वर्षातून दोन वेळा (नोव्हें व एप्रिल) परिक्षा घेतल्या जातात. त्यांची नालासोपारा व मुंबईत अनेक ठिकाणी परिक्षा केंद्रे आहेत. ''संगीत विशारद'' ही पदवी मिळविण्यासाठी ७ परीक्षा द्याव्या लागतात. यात लेखी व प्रात्यक्षिक परीक्षांचा समावेश असतो.

आपल्या समाजातील अनेकांनी या क्षेत्रात यावं व चर्चमधील उपासना अधिक भक्तीमय करण्यासाठी सर्वांना बाळ येशूचा आशिर्वाद लाभावा हीच सदिच्छा.


*With Best Compliments From*

**P**ereira
**E**lvis
**A**nita
**R**amet
**L**isa

**PEARL FAMILY**
**Chawkale**

# अनुभव

*बॅप्टीस्ट वाझ, दारसेंग*

## विधवेचे दान

नवीन चर्चचा पायाभरणी समारंभ पार पडला व त्या परिसरातील लोक आपला आळस झटकून कामाला लागले. गावागावांतून कार्यकर्त्यांचा जथ्था देणगी गोळा करण्यासाठी फिरत होते. प्रतिसाद उत्तम होता त्यामुळे कार्यकर्त्यांचा उत्साह दुणावला होता. अशाच एका गावात देणगी गोळा करण्यासाठी कार्यकर्ते फिरत असताना ते एक जुनाट व जीर्ण घराजवळ आले. कार्यकर्ते त्या बाईला ओळखत होते. सात आठ वर्षापुर्वी त्या बाईचा यजमान स्वर्गवासी झाला होता, त्या बाईचा एकुलता एक मुलगाही काळाने हिरावून नेला होता. ती एकटी, निराधार, निर्धन होती. मजूरी करून ती आपला पोटाची खळगी भरत होती.

ओळखीच्या कार्यकर्त्याने तिची विचारपूस केली व ते निघणार इतक्यात त्या बाईने म्हटले 'तुम्ही चर्चसाठी देणगी गोळा करत आहात ना, माझाही हा खारीचा वाटा', असे म्हणून तिने आपल्या कमरेला खोवलेल्या बटव्यातून शंभर रूपयाची नोट त्या कार्यकर्त्याच्या हाती दिली. क्षणभर तेथे स्तब्ध वातावरण झाले. कोण्याच्यासाठी तोंडून शब्द फुटेना. सारे अवाक झाले. एका निर्धन विधवेने आपली सारी पूंजी चर्चला अर्पण केली होती. देणगीची पावती देताना कार्यकर्त्याचा हात थरथरत होता. कारण बायबलमधील विधवेला त्यांनी प्रत्यक्ष पाहिले होते.

## खिलाडुवृत्ती

मी, माझा मित्र सुप्रसिद्ध रणजी क्रिकेटपटू संजय पाटील हयाच्याबरोबर वानखेडे स्टेडिअम मध्ये भारत व पाकिस्तान दरम्यान खेळल्या गेलेल्या एकदिवसीय सामना पाहण्यासाठी गेलो होतो. आमच्या आजूबाजूला आजी - माजी क्रिकेटपटू तसेच काही प्रतिष्ठीत लोक बसले होते. समोरच्या आसनावर एक चाळीसीकडे झुकलेली व्यक्ती बसली होती. समोर सचिन तेंडुलकर फलंदाजी करत होता. व त्याला वसीम अक्रम गोलंदाजी करत होता. अक्रमच्या एका चेंडूवर सचिनने षटकार मारला. त्याच वेळी त्या व्यक्तीने आंनदाने उडी मारली, जोरात टाळया वाजवून तो नाचू लागला. पण दुसऱ्याच चेंडुवर अक्रमच्या उत्कृष्ट इनस्विंगवर सचिनचा त्रिफळा उडाला. स्टेडिअम मध्ये शांतता पसरली परंतु ती व्यक्ती परत एकदा मघासारखाच आनंद व्यक्त करू लागली. आम्हा सर्वांना त्याची कृती विचित्र वाटली. माझ्या मित्राने त्याला विचारले की तू नक्की कोणत्या संघाला प्रोत्साहन देतोयस. तेव्हा तो म्हणाला की मी इथे खेळाचा आनंद लुटण्यासाठी आलो आहे. सचिनने पटकार मारला तेव्हा त्याचे टायमिंगवर मी इतका खुष झालो की स्वत:ला विसरून उडी मारली आणि नंतर अक्रमचा इनस्विंग इतका उत्कृष्ट होता की सचिनसारखा फलंदाजीचा बादशहा त्रिफळाचित झाला म्हणून मी पुन्हा एकदा आंनद व्यक्त केला. त्याचा उत्तराने आम्ही सर्व अवाक झालो.

# मधुरतम गीत

जगदीश पिल्ले

आओ खुशी से हम सब गाये एक मधुरतम गीत ।
प्रभू येशूने जन्म लिया है झूम उठा संगीत ।
शांती का एक तारा आया, शुभ संदेशा उसने लाया ।
बेथलेहेम की पुनीत धरापर येशू आया, येशू आया ।
माँ मारिया की गोद मे सारे विश्व का पालन हारा आया ।
देख गडरिया नाच उठे सब येशू आया, येशू आया ।
स्वर्ग ये उतरा गोशालामें विश्व हुआ सुरभित ।
प्रभू येशू के रुप मे जन्मा जीवन का संगीत ।।
जब जब विश्व में जुल्म बढा है, तब तब येशूने जन्म लिया है ।
दु:खियो का हर दु:ख हरने को जाने कितने जुल्म सहा है ।
सत्य, अहिंसा और धर्म हित प्राणों का बलिदान किया है ।
मानवता ज्योत जलाकर हमको यह उपदेश दिया है ।
दानवता को छोडो अब तो, करलो सबसे प्रीत ।
प्रभू येशू की राह पे चलकर बन जाओ जगजीत ।।

# चारोळ्या

सुनिल सोकाळकर

आपल्या जिवनाचं हे असंच असतं
आज मेजवानीला पंचपक्वाने
उद्या कधीतरी मीठ भाकरी
परवा पोट खपालीला असतं.

त्याला क्रूसावर खिळलं गेलं
कारण तो समाज सुधारण्यास निघाला होता
मध्ये तो, दोन्ही बाजूने दोन चोर होते
आमच्या राजकर्त्यांचे ते प्रतिक तर नव्हते.

फुलं उमलतात, फुलं सुकुनही जातात
झाडं फळांनी लवंडतात, ओकीबोकीही होतात
विसरण्याचा तुला प्रयत्न करतोय
पण तेवढाच अधिक जवळ मी पोहोचतोय.

इथे गफला तिथे अफरातफर रोज चालू आहे
कुठे खाऊन खाऊन अजीर्ण होतयं
कुठे पोट सुटलयं म्हणुन डाएट सुरू आहे
काही ही करा, शेवटी तीन बाय सहाची खाच तयार आहे.

# कुतूहल

संग्राहक - ख्रिस्तायन परिवार

## आपल्या शरीरातील शिरा निळया का दिसतात?

आपण ज्या रक्तवाहिन्यांना शिरा म्हणतो, त्यांच्यामधून पेशीपर्यंत ऑक्सीजन पोहोचवून पुन्हा फुपुफसाकडे परत निघालेलं रक्त वाहत असते. असे ऑक्सीजन नसलेले रक्त ते रंगाने लाल असत नाही. त्याचा रंग निळसर लाल किंवा जांभळट झाक असणारा असतो. शिरांची जाडी अतिशय कमी असते तसेच या त्वचेच्या अगदी जवळ म्हणजे स्नायुंच्या पृष्ठभागावर असतात. त्यामुळे एकतर त्या बाहेरुनही त्वचेच्या आत दिसू शकतात. तसेच त्यातून वाहणाऱ्या ऑक्सीजनविरहीत रक्तामुळे त्या निळया दिसतात. त्यांच्या अशा या निळया दिसण्यामुळेच शास्त्रीय भाषेत त्यांना 'नीला' म्हटले जाते.

## जास्त श्रम केल्यास धाप का लागते?

ब-याचदा मनुष्यास पळणे, उडया मारणे, उंचटेकडी, जिना वा पर्वत चढणे आदी क्रिया कराव्या लागतात. या क्रियांमध्ये शारीरिक हालचाल वाढते. या वाढलेल्या जादा हालचालींसाठी जादा शक्तीची आवश्यकता भासते. ही जादा शक्ती जादा रासायनिक ज्वलनातून निर्माण होते. हे वाढीव रासायनिक ज्वलन होण्यासाठी अधिक प्राणवायू लागतो. मिनिटाला अठरा-वीस वेळा श्वास घेऊन हा जादा प्राणवायू मिळत नाही. तेव्हा श्वासोच्छवासांचा वेग वाढवावा लागतो. अधिक जोराने छाती व पोट आकुंचन प्रसरण पावते. दर मिनिटाला अधिक वेळेला ही क्रिया होते. तेव्हा एरव्ही जो श्वासोच्वास चालू असण्याची आपणास जाणीवही नसते, त्याची तीव्रतेने जाणीव होते. ही जाणीव म्हणजेच धाप लागते. त्यामुळे जास्त श्रम केल्यास आपणास धाप लागते.

## आपण खारट पाणी का पिऊ शकत नाही?

भूपृष्ठावर राहणाऱ्या कोणत्याही प्राण्याच्या शरीराला ०.९० टक्क्या पेक्षा जास्त मीठ असलेले पाणी रक्तात जास्त टिकवून धरता येत नाही. मनुष्यासह सगळेच प्राणी त्यामुळे अधिक तीव्र प्रमाण असणारे पाणी पिल्यास एकतर ओकतात अगर घामावाटे व लघवीवाटे ०.९० टक्क्यांपेक्षा अधिक असलेले मीठ बाहेर फेकून देऊन ०.९० टक्के हे योग्य प्रमाण राखतात. माणसाची मूत्रपिंडे ०.२० टक्क्यांपेक्षा अधिक तीव्र मीठ असणारे पाणी घेऊ शकत नाही. समुद्राच्या जलात ३.५ टक्के मीठ असते. त्यामुळे समुद्राचे पाणी अगर तत्सम खारट पाणी माणसास सोसत नाही. म्हणून आपण खारट पाणी पिऊ शकत नाही.

## द्रव पदार्थाचे वाफेत रुपांतर कसे होते?

प्रत्येक पदार्थ हा अतिशय सुक्ष्म अशा रेणूंचा बनलेला असतो या रेणूंमध्ये परस्पर आकर्षण असल्यामुळे ते जवळजवळ राहतात. या आकर्षणास संसंगीय बल म्हणतात. ते गतीशील असतात. त्यामुळे त्यांच्यात प्रत्याकार्षणही असतं जोपर्यंत आकर्षण हे प्रत्याकर्षणापेक्षा अधिक बलवान असतं, तोपर्यंत पदार्थ धनरुपात राहतो. उष्णतेने रेणूंची गती वाढते. त्याबरोबर प्रत्याकर्षणही वाढते. त्यामुळे पदार्थाचे धन पदार्थातून द्रव रुपात रुपांतर होते. अजून उष्णता दिल्याने रेणू स्वतंत्र होतात व द्रवमुक्त होऊन ते हवेत जातात. द्रवाच्या पृष्ठभागापासून मुक्त होऊन हवेत जाणाऱ्या प्रक्रियेला बाष्पीभवन असे म्हटले जाते.

# पर्यावरण जगात

संग्राहक - ख्रिस्तायन परिवार

## वनस्पतीं विषयी विशेष माहिती

जगातील सर्वात जुनी वनस्पती किंग क्लॉन ही असून, ती बारा हजार वर्षापासून पृथ्वीवर अस्तित्वात आहे. ही वनस्पती अमेरिकेतील कॅलिफोर्निया येथे आढळते.

जगातील सर्वात मोठया झाडांची उंची ८५ मीटर एवढी आहे. त्या झाडाचे नाव जर्नल शॅरमॅन, ते अमेरिकेतील कॅलिफोर्निया येथे आढळते.

जगातील सर्वात मोठे जंगल हे रशियात आढळते.

सर्व झाडांमध्ये ओक या झाडाला इतर झाडांपेक्षा सर्वात जास्त पाने असतात.

लाजाळूचे झाड हे स्वत:चे संरक्षण स्वत:च करण्याचा प्रयत्न करते त्यासाठी ते स्वत:ला मिटवून घेते.

खजुराची झाडे ५०० ते ६०० वर्षे जगतात आणि तोपर्यंत त्यांना फळे येतात.

कमळाचे बी ही सर्व बियांत अत्यंत टिकाऊ असते व ती हजारो वर्षे टिकू शकते.

जगात सर्वत्र आवडीने उपयोगात आणले गेलेले फळ म्हणजे सफरचंद आहे.

बोर्निओ बेटात साबुदाण्याचे प्रचंड उत्पादन होत असल्यान त्याला साबुदाण्याचे बेट म्हणतात.

बांबू हा गवताताच सर्वात उंच वाढणारा प्रकार असून, एका दिवसात १ मीटर उंच वाढणारे बांबूचे प्रकार आहेत.

निवंडूगाच्या एक हजाराहून अधिक जाती आहेत. सर्वात छोटी 'पिनकुशन' ही असून, काही जाती २२ ते २५ मीटर एवढया उंच वाढतात.

## जगातील काही वैशिष्टयपूर्ण फुलांबद्दल माहिती

जगातील सर्वात मोठा फुल 'प्लेशिआ अश्नोल्डिया' असून ते सुमात्रा बेटातील वनात आढळते. जगातील सर्वात लहान फुल 'वूल्फिया' या पाणवनस्पतीचे असते. या फुलाचा व्यास ०.७ मि. मी असतो. नवीन संशोधनानुसार 'पिलिया मायक्रोफायला' ही वनस्पती सर्वात लहान असून, तिचा व्यास ०.३५ मि. मी असून, ती पश्चिम भारतात आढळते. पांढऱ्या झेंडूचे फूल हे जगातील दुर्मिळ फुलांपैकी एक मानले जाते. 'शूटिंग स्टार' नावाचे एक दुर्मिळ फुल आहे. ते तारा पडताना दिसतो तसे दिसते. काही निवडुंगांनाही सुंदर फुले येतात. 'ब्रम्हकमळ' हे सुद्धा हिमालयात आढळणारे एक सुंदर फूल आहे. बहुतेक सर्व फुले ही काही ठरावीक हंगामात फुलतात पण काही जातींची फुले आपणांस वर्षभर उपलब्ध होऊ शकतात.

डास हा जास्तीत जास्त तीन आठवडे जगू शकतो. मनुष्यास अत्यंत उपद्रवी ठरलेल्या या किटकाच्या जगात सुमारे तीन हजार जाती आहेत. डासाला स्वरयंत्र नसते. डास उडताना त्याच्या पंखांची गतीने हालचाल होते. डासांचे पंख दर सेंकदाला तीनशे वेळा खालीवर होतात.

## झाडांच्या पानांच्या हिरवेपणाचे कारण

सुरुवातीस प्रत्येक वनस्पतींची कोवळी पाने ही गुलाबी लालसर दिसतात व नंतर ती हिरवी बनतात कारण त्या पानांमध्ये विशिष्ठ पदार्थ असतात. तसेच पर्णपीतकाच्या अस्तित्वामुळे ती पिवळी दिसतात. नवजात पानांमध्ये 'अन्थोसाअिनन' नावाचा तांबडा पदार्थ असल्याने ती पाने लालसर-गुलाबी दिसतात. काही काळा नंतर त्यांच्यात हरीतद्रव्य व पर्णपीतक निर्माण होते व त्यांचा रंग बदलून हिरवा होतो. जेव्हा काही पानांमध्ये ही दोन्ही द्रव्ये असतात तेव्हा

ते पान मिश्रणाचे रंग दाखवते.

**प्राण्यां विषयी विशेष माहिती**

बीव्हर हा प्राणी निसर्गाचा इंजिनिअर आहे. नदीवर योग्य जागेची निवड करुन काटकया व माती गोळा करुन ता चांगलाच भक्कम बांध घालतो. त्याची लांबी सुमारे १५० मीटर व रुंदी ८ मीटर तसेच उंची ४ मीटर्स एवढी असते. त्याचे वास्तव्य त्याच्या खाली असते.

डासांमध्ये रक्त शोषणाचे कार्य केवळ मादी करते. ही मादी तिच्या वजनाच्या दुप्पट रक्त पिऊ शकते.

मधमाशीचा उडण्याचा वेग ताशी ११ किलोमीटर एवढा असतो.

वाळवीच्या जाती सर्वसाधारणपणे १७०० हून आहेत. वाळवीची घरे नेहमी जमिनीखाली असून, ती कधी कधी जास्त ८ मीटरहून अधिक उंच असतात.

**हवेतील विविध वायू व त्यांची उपयुक्तता**

**कार्बन-डाय-ऑक्साईड** : या वायूचा उपयोग आग विझविण्यासाठी, सोडावॉटर तयार करण्यासाठी तसेच झाडांसाठी होतो.

**ऑक्सिजन** : हा वायू श्वसनासाठी सर्व सजीव प्राण्यांना आवश्यक असतो तसेच ज्वलनासाठी, उंचीवरील श्वसनास मदत करण्यासाठी उपयुक्त असतो.

**हायड्रोजन** : तेलाचे रुपांतर खोटया तुपात करण्यासाठी उपयुक्त.

**ऑर्गन** : इलेक्ट्रीक बल्बमध्ये हा वायू वापरतात.

**न्युऑन** : विदयुत प्रकाशाच्या नावासाठी, जाहिरांतीसाठी वापरतात.

**नायट्रोजन** : ऑक्सिजनची तीव्रता कमी करण्यासाठी तसेच वनस्पतींचे अन्न तयार करण्यासाठी उपयुक्त.


*नाताळ व नव वर्षाच्या शुभेच्छा !!!*

• होम डेकॉर पेन्टींग कॉन्ट्रेक्टर •



बंगलो, फ्लॅट, बिल्डिंग अॅन्ड
शॉप यांचे सर्वप्रकारचे पेन्टिंग करून मिळेल.
तसेच पी.ओ.पी. फॉल सिलिंग करून मिळेल.

**प्रो. दिपक परेरा**

चौकाळे, फोन: २४००१७३.

नाताळ सणाच्या हार्दिक शुभेच्छा

**स्वर्गवासी इयांव पाटील**

यांच्या स्मरणार्थ देणार

**पाटील बंधू**

गोखिवरे

फोन : २४६२६४४

नाताळ सणाच्या
हार्दिक शुभेच्छा

**श्री. व. सौ. लेस्ली कार्व्हालो**
**मास्टर एंजेल, इयान**

सांडोर, वसई

फोन : २३२२५१८

नाताळ सणाच्या
हार्दिक शुभेच्छा

**श्री. व. सौ. पैट्रीक गोम्स**

उपाध्यक्ष,
होली क्रॉस चर्च पॅरीश कॉन्सिल

गोम्स आळी.

फोनः २४०६४६४

नाताळ सणाच्या
हार्दिक शुभेच्छा

**श्री. व. सौ. चार्ली डिसिल्वा**

दहिसर, मुंबई

फोन : २८९३५७७९

## नाताळ सणाच्या व नव वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा

श्री. आगुस्तीन व्हिक्टर रॉड्रिग्ज, रांबाई

सौ. कल्पना एम. आचारी, मेघदूत, मिरारोड

श्री. मॅथ्यू डिमोन्टी, दारसेंग

श्री. पायस तुस्कानो, घोसाळी, नंदाखाल

श्री. जॉन इतूर रिबेलो, चौकाळे

सौ. सविता राजीव जोशी, बोरीवली, मुंबई

श्री. महादेव बबन लामखडे, भांडूप, मुंबई

सौ. शैला व श्री. लूईस ब. परेरा, चौकाळे

सौ. सुनिता टोनी कोरिया, निर्मळ

श्री. थॉमस गोन्सालवीस, वंडा

# बॉलीवूडचा इतिहास

ख्रिस्तोफर रिबेलो

भारतामध्ये पहिले चलचित्र ७ जूलै १८९६ रोजी वॉटसन हॉटेल, एस्पल्नेड मॅशन, मुंबई येथे झळकले, ते लूमिरे बंधूच्या सिनेमॅटोग्राफच्या साहाय्याने प्रकाशित झालेल्या सहा ध्वनीविरहीत छोटया फिल्मद्वारे. १८९९ मध्ये जेव्हा हरिशचंद्र भाटवडेकर यांनी दोन छोटया फिल्म मुद्रित केल्या ते पहिले रेकॉर्डींग होते. हिरालाल सेन आणि एफ. बी. थानावला यांनी कलकत्ता आणि मुंबई येथे १९०० मध्ये दोन छोटया फिल्म बनवल्या. १९०२च्या सुमारास जे. एफ. मदन आणि अब्दुल्ला युसुफ अली यांनी बायोस्कोप द्वारे आयात केलेल्या फिल्मस् दाखवण्यास सुरुवात केली. १९१२ मध्ये एन. जी. चित्रे आणि आर. जी. हर्नी यांनी पुंडलिक नावाचा चित्रपट निर्माण करुन १८ मे रोजी प्रदशित केला परंतु तो फक्त नावाने भारतीय होता.

धुंडीराज गोविंद फाळके ऊर्फ दादासाहेब फाळके यांनी पहिला पूर्ण देशी मुक चित्रपट 'राजा हरिशचंद' या नावाने बनवला, ज्याने भारतीय सिनेमा सृष्टीची मुहूर्तमेढ रावली. हा चित्रपट ३ मे १९१३ रोजी कॉरोनेशन सिनेमा, मुंबई येथे प्रर्दशित झाला. १९१७ मध्ये बंगालमध्ये पहिला बंगाली चित्रपट 'सत्यवादी राजा हरिशचंद्र' जे. एफ. मदन यांच्या एल्फिस्टंन बायोस्कॉप या कंपनीने निर्माण केला. मद्रासमध्ये १९१७ साली पहिला दाक्षिणात्य चित्रपट 'किचक वधम' नटराज मुदलीयार यांनी निर्माण केला. १९२० मध्ये भारतीय सिनेसृष्टीने आकार घेण्यास सुरुवात केली. विसच्या दशकात अनेक नवीन कंपन्या व निर्माते पुढे आले. धीरेन गांगुली (इंग्लंड रिटर्नड), बाबूराव पेंटर (सावकारी पाश), सचेतसिंग (शकुंतला), चंदूलाल शाह (गुणसूंदरी) तसेच आर्देशीर असरानी आणि व्ही. शांताराम हे निर्माते चित्रपटसृष्टीत स्थिरस्थावर झाले. तरीही सर्व चित्रपट मुक असायचे. अजूनही चिपपट बोलू लागला नव्हता.

पहिला भारतीय बोलपट 'आलम आरा' हा इंपिरीयल फिल्म कंपनीने निर्माण केला व आर्देशीर इसरानी या चित्रपटाचे दिग्दर्शक होते. हा चित्रपट १४ मार्च १९३१ रोजी मॅजेस्टीक सिनेमा, मुंबई इथे प्रर्दशित झाला. बोलपटांनी तद्नंतर भारतीय सिनेसृष्टीत परिवर्तन घडवून आणले. त्याच वर्षी बंगाली, तेलगू आणि तामिळी भाषेत बोलपट निर्माण झाले. तिसऱ्या दशकात तीन मोठे बॅनर्स प्रस्थापित झाले. ते म्हणजे प्रभात, बॉम्बे टॉकीज आणि न्यू थिएटर्स, यांनी सामाजिक अन्यायाला वाचा फोडणारे चित्रपट निर्माण केले. त्यात व्ही. शांताराम यांचे 'दुनिया न माने', 'आदमी' आणि 'पडोसी', फ्रॅन्झ ऑस्टन यांचा 'अछूत कन्या', दामले आणि फतेहलाल यांचा 'संत तुकाराम', मेहबूब यांचा वतन, एक ही रास्ता आणि औरत यांचा समावेश होता. आर्देशीर इसरानी यांनी पहिल्यांदाच रंगीत चित्रपट 'किसान कन्या' या नावाने १९३७ मध्ये निर्माण केला. याच दशकात मराठी (अयोध्येचा राजा - १९३२), गुजराती (३२), कन्नड (३४), ओरीया (३४), आसामी (३५), पंजाबी (३५) आणि मल्याळम (३८) या भाषांत बोलपट तयार झाले.

चाळीसच्या दशकात, ज्यात दुसरे महायुदध् झाले आणि भारतास स्वातंत्र्य मिळाले, हे दशक भारतीय चलचित्रासाठी महत्वाचे ठरले. यात चित्रसृष्टीचे महत्व अधिक वाढले. पहिला भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव १९५२ मध्ये मुंबई येथे झाला. चित्रपटसृष्टी दृढ होण्यास या महोत्सवाचा फार मोठा हातभार लागला. १९५५ मध्ये सत्यजित रे यांच्या 'पाथेर पांचाली' या चित्रपटाने भारतीय चित्रसृष्टीला आंतरराष्ट्रीय पातळीवर नेले. मदर इंडिया (मेहबूब), मूगल-ए-आझम (के. आसिफ) हे भव्य आणि बॉक्स ऑफीसवर खूप यशस्वी झालेले चित्रपट निर्माण झाले. नंतर अनेक भव्य दिव्य चित्रपट प्रदर्शित होत गेले. भारतीय सिनेसृष्टी फार मोठया प्रमाणावर नावारुपाला आली. 'अमिताभ बच्चन' सारख्या सूपरस्टार या सिने सुष्टीत निर्माण झाला. 'लगान' सारख्या चित्रपटाने पुन्हा एकदा भारतीय चित्रपटसृष्टीला आंतरराष्ट्रीय पातळीवर मानाचे स्थान मिळवून दिले.

एकंदर पाहता नऊ दशकाचा एक दिर्घ प्रवास भारतीय चित्रपटसृष्टीने केलेला आहे. या नऊ दशकात अनेक प्रकारचे बदल भारतीय चित्रसृष्टीत घडून आले. अंडरवर्ल्डचा अंतर्भाव झाला. केबल टिव्ही मुळे थिएटर्स ओस पडू लागली तरीही चित्रपट निर्मितीचा उत्साह कमी झाला नाही. वर्षाला सुमारे १२० ते १३० चित्रपट या सिनेसृष्टीत निर्माण होतात. आज पर्यंत ३०००० पर्यंत चित्रपट या सिनेसृष्टीत निर्माण झालेले आहेत. 'क्लालिटी' नसली तरी 'क्वान्टिटी' मध्ये भारतीय चित्रपटसृष्टी अनेक नवे रेकॉर्ड निर्माण करीत आहे.

*****

नाताळच्या व
नवीन वर्षाच्या शुभेच्छा
तसेच
'ख्रिस्तायन'साठी शुभचिंतन

**सौ. अपलन व श्री. आगस्तीन रिबेलो**
**अल्वीन, आल्वन व अमोल**

'निवान्त' चौकाळा.

नाताळच्या व
नवीन वर्षाच्या शुभेच्छा

**श्री. लूईस परेरा**
पॅरीश कॉन्सिल सदस्य

चौकाळे.

# क्रिडाजगत

*संग्राहक - खिस्तायन परिवार*

**क्रिकेट**

- पहिला एकदिवसीय सामना ऑस्ट्रेलिया व इंग्लंड यांच्यात ५ जानेवारी १९७१ रोजी मेलबोर्न येथे झाला.
- पहिला 'टाय' एकदिवसीय सामना ११/०२/१९८४ या दिवशी ऑस्ट्रेलिया व वेस्ट इंडीज यांच्यात झाला.
- कसोटी सामन्यातील धावांचा निचांक (२६ धावा) न्यूझीलंडने इंग्लंड विरुध्द् १९५४-५५ च्या मोसमात नोंदविला.
- कसोटीमध्ये त्रिशतक झळकाविणाऱ्यामध्ये आशियाई क्रिकेटपटूंतून पाकिस्तानच्या हनिफ मोहम्मद आणि श्रीलंकेच्या सनथ जयसूर्या या फक्त दोघांचा समावेश आहे.
- एकदिवसीय सामन्यात पहिले शतक इंग्लंडच्या डेनिस एमिस याने नोंदविले.
- मार्वन अटट्ापटट्ूने कसोटीच्या पहिल्या पाच डावात फक्त एक धाव काढली होती.
- सचिन तेंडूलकर आपल्या पहिल्या दोन सामन्यांत पहिल्याच चेंडूवर बाद झाला होता.
- शून्यावर आउट न होता जास्तीत जास्त धावा काढणा-यांमध्ये रिकी पॉटींगचा नंबर पहिला आहे.
- फलंदाज शून्यावर बाद झाल्यानंतर टिव्हीवर जो 'डक' येतो तो प्रथम ऑस्ट्रेलियाचा चॅनेल ९ ने दाखविण्यास सुरुवात केली.
- कसोटी क्रिकेटचा दर्जा मिळाला नसतानाही बांगलादेशाने एका कसोटीचे यजमानपद भूषविले. आशियाई कसोटी अंजिक्यपद स्पर्धेतील अंतिम सामना बांगलादेशातील बंगबंधू स्टेडिअम मध्ये खेळवला गेला होता.
- एकदिवसीय सामन्यातील पहिला चेंडू खेळण्याचा मान इंग्लंडच्या जेफ्री बॉयकॉटला मिळाला. एकदिवसीय सामन्यात पहिल्यांदा ९९ वर बाद होण्याचा पराक्रम बॉयकॉटनेच केला होता.
- डावातील सर्वच्या सर्व दहा गडी बाद करण्याचा पराक्रम सर्वप्रथम इंग्लंडच्या जिम लेकरने ऑस्ट्रेलियाविरुध्द १९५६ मध्ये मॅनचेस्टर येथे केला. त्यानंतर भारताच्या अनिल कुंबळेने १९९९ मध्ये पाकिस्तान विरुध्द् दिल्ली कसोटीत हा पराक्रम केला.
- प्रथम श्रेणी सामन्यांमध्ये सर्वप्रथम १०० शतके इंग्लंडचे डब्ल्यू. जी. ग्रेस यांनी झळकाविली.
- भारत, आपला पहिला एकदिवसीय सामना १३/०१/७४ रोजी इंग्लंडविरुध्द लीड्स येथे खेळला. भारतात प्रथम आयोजित झालेला सामना २५/११/८९ रोजी खेळविला गेला.
- सुनिल गावसकरची कसोटीमध्ये सर्वात जास्त शतके (३४) आहेत. आणि फक्त एकच एकदिवसीय शतक आहे.
- अब्दुल हाफिज स्वातंत्र्याअगोदर भारतातर्फे खेळला पण पाकिस्तानला कसोटी दर्जा मिळाल्यानंतर तो ए. एच. कारदार या नावाने खेळला व त्याने २३ सामन्यांत पाकिस्तानचे नेतृत्व केले.
- भारत आपला पहिला कसोटी सामना १९३३ साली इंग्लंडविरुध्द् मुंबईतील बॉम्बे जिमखाना ग्रांउडवर खेळला.
- बी. चंद्रशेखर एकमेव असे खेळाडू आहेत, ज्यांच्या कसोटी धावा (१७७ धावा) त्यांच्या एकूण कसोटी बळींपेक्षा (२४२ बळी) कमी आहेत.

- न्यूझीलंडचा ली जरमॉन असा खेळाडू आहे ज्याने आपले पदार्पण संघाचा कर्णधार म्हणून केले. तो जेवढे सामने खेळला त्यात तो कर्णधार होता.
- पाकिस्तानच्या जलालूद्दिन ने एकदिवसीय सामन्यातील पहिली हॅट्रीक आस्ट्रेलिया विरुध्द् १९८० मध्ये नोंदली.
- कसोटी क्रिकेटमध्ये एका डावात सर्वाधिक धावा (९५२) करण्याचा मान श्रीलंकेला आहे. १९९७ मध्ये भारताविरुध्द् ही कामगिरी केली.
- डेस्मंड हेन्स आपल्या पहिल्या व शेवटच्या एकदिवसीय सामन्यात शतक फटकाविणारा एकमेव खेळाडू आहे.
- इ. ई. आचोंग हा चिनी वंशाचा खेळाडू १९३० मध्ये वेस्ट इंडीज तर्फे खेळला.

*****

*"धर्म वेगवेगळे असले, तरी मनुष्य जीवनाचे स्वरूप सर्वत्र एकसारखे आहे. सर्वांची सुखदु:खे आणि गरजा सारख्या आहेत. आपल्याला हक्कांच्या मर्यादेत सर्वांच्या सामान्य हितासाठी खांद्याला खांदा भिडवून काम करू लागलो तर ह्या एकात्मतेमुळे राष्ट्राचा प्रसंगी गरीबांचा उत्कर्ष घडेल."*

*(गो. कृ. गोखले)*

नाताळच्या व
नवीन वर्षाच्या शुभेच्छा
तसेच
'ख्रिस्तायन'साठी शुभचिंतन

**रिबेलो किराणा स्टोअर्स**

प्रो. फ्लोरीयन रिबेलो
सौ. मार्तीन, कु. रूपाली, मिनल, शितल.

'शितल' चौकाळा.

नाताळच्या व
नवीन वर्षाच्या शुभेच्छा

**श्री. रूपेश रॉड्रिग्ज**

अध्यक्ष,
वसई तालूका युवक काँग्रेस

दारसेंग

# बोधपर गोष्टी

*संग्राहक - ख्रिस्तायन परिवार*

## १. बऱ्या वाईट वस्तू

एका शहरातील व्यापाऱ्याने काही पोती बटाटे खरेदी केले. ते बटाटे गोदामात ठेवत असताना त्यातील काही खराब झालेले बटाटे नोकराने बाजूला काढले. इतर बटाटयांमध्ये काही भरपूर डोळे असलेले ओबडधोबड बटाटे होते व काही बटाटे अत्यंत गुळगुळीत असून ते गोल होते. या गोल व गुळगुळीत बटाटयांना स्वत:च्या सौंदर्याचा भारी गर्व झाला होता. ते सर्वजण त्या ओबडधोबड बटाटयांकडे पाहून तुच्छतेने हसत होते. काही वेळाने नोकर आला व त्या गोल गुळगुळीत बटाटयांना घेऊन गेला. तेव्हा त्यांचा चेहरा पडला कारण ते आता विकले जाणार होते. त्यांना शिजवले जाणार होते व त्यांची भाजी केली जाणार होती.

इकडे ओबडधोबड बटाटे आपल्या नशिबात काय वाढून ठेवले आहे त्याची वाट पाहत बसून होते. काही वेळाने एक शेतकरी तेथे आला व त्या सर्व बटाटयांना घेऊन गेला. तिथे त्याने त्या बटाटयांचे त्यांच्या डोळया नुसार तुकडे केले व जमिनीत पूरले. काही दिवसांनी त्यांची भरपूर रोपे झाली व अजून तीन-चार महिन्यांनी त्यांच्या मुळांजवळ भरपूर बटाटे तयार झाले. त्या बटाटयांना आपले जीवन नवनिर्मितीसाठी घालविल्याचे सार्थक वाटले.

**तात्पर्य:** या जगात आलेल्या प्रत्येक गोष्टींचा काहींना काही चांगल्या कामासाठी उपयोग होतच असतो मग ती वस्तू चांगली वा वाईट असो.

## २. धडाडी

एक गरीब मनुष्य आपल्या दारिद्रयास कंटाळून शहरात गेला. त्याने तिथे प्रामाणिकपणे कष्ट करुन भरपूर पैसे मिळवले. एका वर्षात त्याच्याकडे पुरेसे पैसे साठले. मग तो आपल्या घरी परत निघाला. परत जातानाचा मार्ग हा एका घनदाट जंगलातून होता. परमेश्वराचे नामस्मरण करीत तो पुढे पुढे चालला होता. अचानक झाडीतून एक चोर पुढे आला व त्याने त्या मनुष्याच्या छातीवर पिस्तूल रोखले. हा मनुष्य खूपच घाबरला. पण तो गरीब असला तरी हुशार होता. तो शांतपणे म्हणाला, ''अरे, तुझ्या पिस्तुलात गोळया तरी आहेत का?''

त्याबरोबर त्या चोराने रागारागाने आकाशाकडे पिस्तूल रोखून दोन गोळया झाडल्या. मग तो मनुष्य म्हणाला, "हे माझ्याजवळचे सर्व पैसे हया आणि मला अजून दोन-तीन तरी गोळया झाडून दाखवा" त्या चोराने सर्व पैसे घेतले व अजून तीन गोळया झाडल्या. पुन्हा त्या मनुष्यावर तो गोळी झाडण्यास गेला असता पिस्तुलातून गोळी बाहेर आली नाही. तेव्हा त्या माणसाच्या लक्षात आले की पिस्तूलातल्या गोळया संपल्या आहेत. त्याबरोबर त्याने त्या चोराच्या अंगावर उडी घेतली. व त्याला भरपूर चोप दिला. त्याच्याकडून स्वत:च्या पैशाची पिशवी काढून घेतली व आपल्या गावी परतला.

**तात्पर्य :** संकटाच्या वेळी धीर न सोडता विचारपूर्वक निर्णय घेतले असता संकटातून बाहेर पडण्याचा एखादा उपाय निश्चित सूचतो.

तडफतो बिचारा
तो उंच उंच तारा
गोठयातील जेजुबाळाच्या
दर्शनासाठी

* * * * * * * * * * * * * * * *

'खिस्तायन' ला हार्दिक शुभकामना!
तसेच, सकलजनांना



'नाताळ' व 'नववर्षाच्या'



हार्दिक शुभेच्छा!!

# जोसेफ तुस्कानो
# "हायकू" कुटुंबिय
# गास.



नाताळच्या व
नवीन वर्षाच्या शुभेच्छा

**जैन ऑक्ट्रॉय कॉरपोरेशन**

– मुंबई –

नाताळच्या व नवीन वर्षाच्या शुभेच्छा

# मे. फेबिअन ट्रॅव्हल्स

नाळे

रिचर्ड डिसिल्वा

पापडी, वसई.

फोन: 23223189 मोबाईल: 9822413527

## आम्ही आपले ऋणी आहोत

'ख्रिस्तायन' नाताळ अंकाच्या जडणघडणीसाठी अनेक मदतीचे हात आम्हाला लाभले आहेत.

कसदार असे लेखन पाठवणारे सर्व लेखक गण यांचे सहकार्य अमूल्य, ऋण त्यांचे शब्दापलिकडचे.

अंकास जाहिराती द्वारे हातभार लावणारे सर्व वरिष्ठ मंडळी विशेषत: श्री. पास्कोल गोम्स, श्री. बॅप्टीस्ट वाझ व श्री. पॅट्रीक गोम्स यांचे सहकार्य अवर्णनीय.

सर्व जाहीरातदार, देणगीदार व हितचिंतक यांचे आभार मानावे तेवडे थोडेच.

सातूलीन परेरा मारिया प्रिंटर्स) हयांनी अंकाच्या छपाईसाठी घेतलेली मेहनत शब्दादीत.

'ख्रिस्तायन' परिवार आपल्या सर्वांच्या ऋणात सदैव राहू इच्छिते.

नाताळ सणाच्या व नव वर्षाच्या
हार्दिक शुभेच्छा !!!

# फा. ज्यो परेरा

प्रमुख धर्मगुरू,
सेक्रेड हार्ट चर्च, वरळी, मुंबई.

"कोणतेही चांगले
काम करणाऱ्यांवर संकटे येतातच तथापि
संकटे आली तरी ती आपली परीक्षा आहे असे समजून त्या
संकटाच्या प्रतिकारासाठी आपली सर्व शक्ती पणास लावतो
व आपल्या साधनेवर स्थिर राहतो तोच खरा
'समाजसेवक' बनतो."